किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३● उलगडा
५● अभ्यास, मत बनविणा-या घटकांचा
१७● सामाजिक असमानतेचे उद्योजकीय परिमाण
१९● कारणे युद्धाची....
२३● ....युद्धांनंतर आजचे चिंतन-मंथन
३१● ''लोकशाहीसाठी जग सुरक्षित हवे...''
३३● जिकडेतिकडे (वैद्यकीय पर्यटन)



**खंड १३ : अंक १** **एप्रिल २०१४**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**



वार्षिक वर्गणी १००/- रुपये (**परदेशस्थ वाचकांसाठी $ २०**) वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.** **'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.



वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०,
२५६५७६९७
ई-मेलः- ispe@vsnl.net
website- www.ispepune.org.in



**अर्थबोधपत्रिका**
**खंड १३ (अंक १) एप्रिल २०१४**
**संपादक - अभय टिळक**
**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**


*'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

**अर्थबोधपत्रिकेचा हेतू**

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# उलगडा

वेळापत्रकानुसार होणा-या (अथवा, होणे अपेक्षित असलेल्या) निवडणुका हे तर प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्थेचे प्राणतत्त्व आणि मुख्य बलस्थान. चालू महिना आणि येणारा पुढील महिना निवडणुकांच्या रणधुमाळीमुळे घुसळणीचा हंगाम ठरावा. निवडणुका ही, खरे म्हणजे, उमेदवारांपेक्षाही मतदारांचीच कसोटी असते. पक्ष, उमेदवार, जाहीरनामा, पूर्वेतिहास, पूर्वानुभव, प्रतिमा, धोरणे... यांसारख्या नेमक्या कोणत्या बाबीचा अथवा बाबींचा विचार करून निवड करावी हा मतदारांसमोर खरोखरच यक्ष प्रश्न असतो. त्याच प्रमाणे, कोणत्या घटकांचा विचार करून मतदार आपला कौल देतात या सवालाचे उत्तर उलगडणे हाही एक मोठा जटिल प्रश्नच होय. या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर शोधणे हे तितकेच गुंतागुंतीचे आव्हान ठरते. भारतासारख्या प्रचंड विविधतेने भरलेल्या, जाती-उपजाती-पोटजाती यांची किचकट उतरंड असलेल्या देशात उमेदवाराची जात, धर्म, प्रादेशिकता, स्थानिकता, वर्ण यांसारख्या घटकांचा विचार मतदान करतेवेळी प्रकर्षाने (आणि कदाचित प्रामुख्यानेही) केला जातो, हे वास्तव आजवरच्या विविध अभ्यासांवरून शाबित झालेले आहे. किंबहुना, 'जात' हाच मतदानावर आणि मतदारांच्या उमेदवार निवडीवर प्रभाव टाकणारा एक (कदाचित, एकमात्र) अत्यंत महत्त्वाचा घटक असतो अथवा आहे, असे प्रतिपादन राज्यशास्त्राच्या अभ्यासकांची एक भक्कम फौज वारंवार करत असते. दुसरीकडे, उदारीकरणानंतरच्या अलीकडील दशकभरात भारतीय राजकारणाचा पोत बदलत असून जात, धर्म, वर्ण यांसारख्या मुद्यांच्या परिघातच गुंतून पडलेले राजकारण आणि निवडणुकांचे विश्व आता हळूहळू विकास, कार्यक्षम प्रशासन, काटेकोर आर्थिक व्यवस्थापन, आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाची भविष्यकालीन वाटचाल... यांसारख्या पैलूंभोवती गुंफले जाते आहे, असेही विश्लेषण संबंधित अभ्यासांच्या आधारे मांडण्यात येते. सर्वसामान्य मतदार आणि नागरिक मात्र या सगळ्या चर्चाविश्वाबाबत बहुशः अनभिज्ञ असतो अथवा त्याबाबतचे त्याचे आकलन तुटपुंजेच राहते. तिसरीकडे, प्रवाहातील मुख्य राजकीय पक्षांचे जाहीरनामे, आताशा, देशासमोरील आर्थिक, औद्योगिक व वित्तीय प्रश्नांबाबत काही एक ठोस भूमिका मांडण्याबाबत अधिक जागरूक झालेले दिसतात. विकासविषयक तसेच आर्थिक घटकांचा मतदारांच्या निवडविषयक विचारप्रक्रियेवर नेमका काय परिणाम नेमका कसा होत असावा यांबाबतचा काही एक उलगडा करून घेण्याचा प्रयत्न करणारा एक अभ्यास भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष आणि आपल्या देशातील एक ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. (डॉ.) विकास चित्रे यांनी अलीकडेच केला. त्या अभ्यासाचे निष्कर्ष या अंकात विस्तृतपणे सादर केलेले आहेत. पहिल्या महायुद्धाचे शिंग १९१४ साली फुंकले गेले. म्हणजेच, चालू वर्ष हे पहिल्या महायुद्धाच्या शताब्दीचे वर्ष. या गेल्या शतकभरादरम्यान उभ्या जगाचा चेहरामोहरा कसा बदलला याचे चित्र उलगडून मांडणारे दोन लेख शताब्दी वर्षाचे औचित्य ध्यानात घेऊन इथे आवर्जून दिलेले आहेत. ■■



## वाचकांना विनंती

'अर्थबोधपत्रिके'चा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यासाठी www.ispepune.org.in इथे वाचकांनी अवश्य भेट द्यावी.**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

सामाजिक

# अभ्यास, मत बनविणा-या घटकांचा...

आपल्या मताचा कौल निवडणुकीदरम्यान देऊन उमेदवार अथवा पक्ष (किंवा दोन्हीही) निवडत असताना मतदार कोणकोणत्या बाबींचा विचार करत असतो, हा नेहेमीच कुतूहलाचा विषय ठरतो. किंबहुना, मतदारांच्या निर्णयावर आणि त्याद्वारे ते करत असलेल्या निवडीवर प्रभाव पाडणा-या घटकांचा शोध व विश्लेषण करणारे काही अभ्यास अलीकडील काळात उपलब्ध होत आहेत. लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकांच्या काळात असे अभ्यास झालेले दिसतात. मतदारांच्या मनाचा कानोसा मतदानपूर्व पाहण्यांद्वारे घेऊन अशा प्रकारचे अभ्यास राज्यशास्त्राचे अभ्यासक व संशोधक करत असतात. उमेदवार आणि/अथवा पक्ष यांच्या मतदार करत असलेल्या निवडीवर प्रभाव टाकणारे जे अनेकविध घटक असतात त्यांत काही आर्थिक व सुशासनसंलग्न घटकांचाही समावेश असावा हे ओघानेच येते. मतदारांवर प्रभाव पाडणा-या आर्थिक तसेच सुशासनसंलग्न घटकांचा अभ्यास करण्यासंदर्भात राज्यशास्त्राचे अभ्यासक वापरत असलेली पद्धती आणि अर्थशास्त्राचे अभ्यासक वापरत असलेली पद्धती यांत काहीसा फरक आढळतो. आपल्या देशात २००९ साली घेण्यात आलेल्या लोकसभेच्या निवडणुकीदरम्यान संयुक्त पुरोगामी आघाडी आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडी यांपैकी एका आघाडीच्या पारड्यात पसंतीचे माप टाकत असताना, उमेदवाराने आणि/अथवा त्याच्या पक्षाने आर्थिक आघाडीवर बजावलेल्या कामगिरीबाबतच्या ज्याच्या त्याच्या धारणेला अनुसरून मतदारांनी कौल दिला असावा, असे प्रमेय राज्यशास्त्राचे अभ्यासक त्यांच्या अभ्यासांदरम्यान मांडताना दिसतात. तर, मतदार ज्या राज्यात राहतो त्या राज्याच्या ठोकळ उत्पादितामधील वाढीचा वार्षिक सरासरी वेग हा आर्थिक आघाडीवरील कामगिरीचा निदर्शक मानून मतदारांनी त्या नुसार उमेदवार आणि/अथवा पक्ष निवडला असावा (किंवा निवडलेला आहे) असे मानून अर्थशास्त्राचे अभ्यासक आर्थिक घटकांच्या मतदारांवरील संभाव्य प्रभावाचा अभ्यास करताना दिसतात.



या संदर्भात एका महत्त्वाच्या बाबीचा विचार करणे भाग ठरते. राज्य ठोकळ उत्पादितामधील वाढीचा वार्षिक सरासरी वेग हाच पक्ष आणि/अथवा उमेदवार यांनी बजावलेल्या आर्थिक कामगिरीचा एकमात्र निदर्शक आहे आणि त्याचाच प्रभाव मतदारांच्या निवडीवर पडत असतो (अथवा असावा), असे मानले तर अभ्यासपद्धतीच्या अंगाने दोन प्रश्न निर्माण होतात. राज्य उत्पादितामधील वाढीच्या वार्षिक सरासरी दराव्यतिरिक्त आर्थिक आघाडीवरील कामगिरीचे तसेच सुशासनाशी संलग्न असे मतदारांच्या मनावर प्रभाव पाडू शकणारे जे अन्य पैलू संभवतात त्यांची उपेक्षा होण्याचा धोका यामुळे बळावतो, ही झाली पहिली समस्या. अशा या अन्य संभाव्य घटकांची/पैलूंची (वानगीदाखल) सूची पुढीलप्रमाणे देता येईलः

(१) ग्राहक किंमत निर्देशांकानुसार मोजली जाणारी महागाई
(२) रोजगाराची दरपातळी
(३) रोजगारातील वाढ
(४) दरडोई उत्पन्न अथवा उपभोगाच्या पातळीतील विषमता
(५) देशाच्या ग्रामीण तसेच शहरी भागांतील रस्त्यांची घनता व तिच्यातील तफावत
(६) पिण्याच्या पाण्याची उपलब्धता
(७) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अथवा स्वस्त धान्य दुकानांसारख्या आपल्या देशात राबविल्या जाणा-या विविध कल्याणकारी योजनांची व्यवहारातील अंमलबजावणी व अशा योजनांचे वास्तवात मिळणारे लाभ
(८) कायदा व सुव्यवस्थेची सर्वसाधारण परिस्थिती आणि राज्याराज्यांतील गुन्हेगारीच्या प्रमाणात तिचे पडणारे प्रतिबिंब

'आर्थिक कामगिरी' या सर्वसमावेशक संज्ञेमध्ये अंतर्भाव होणारे हे सारे घटक देशातील आर्थिक परिस्थिती, सुशासन (गव्हर्नन्स), पायाभूत सेवासुविधा, कल्याणकारी योजना व त्यांची अंमलबजावणी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी सुरक्षा कवच... अशा अनेकविध बाबींशी निगडित आहेत. या व अशा विविध घटकांचा मतदारांच्या निवडविषयक धारणेवर नेमका काय व कसा परिणाम होत असतो हे अभ्यासणे सोपे नसते.

पक्ष आणि/अथवा उमेदवार यांनी आर्थिक आघाडीवर बजावलेल्या कामगिरीचा मतदारांच्या धारणेवर परिणाम होत असतो, असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा अभ्यासपद्धतीशी संलग्न असणारा दुसरा जो मुद्दा उद्‌भवतो तो तुलनेने अधिक सूक्ष्म आहे. अर्थकारण तसेच सुशासनाशी संलग्न विविध बाबींसंदर्भात सरकार जेव्हा नाना प्रकारची धोरणात्मक पावले उचलत असते त्या वेळी त्या धोरणांचा मतदारांच्या धारणेवर नेमका काय परिणाम आणि तो कसा होत असतो, याचाच मुळात पत्ता लागत नाही. नेमका तोच अभ्यास करण्याचा प्रयत्न या ठिकाणी केलेला आहे. देशातील सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक-सामाजिक गरजांशी संलग्न असलेल्या नानाविध बाबींची दखल आपल्या लोकशाही व्यवस्थेमध्ये सक्रिय असणा-या घटकांना आज ना उद्या घ्यावीच लागेल या निरीक्षणास बळकटी पुरविणारा पुरावा या अभ्यासाद्वारे हाती येतो. खास करून भारतासारख्या गरिबीबहुल, निरक्षरतेचे मोठे प्रमाण असणा-या, बहुतांश ग्रामीण आणि जातीपातींची उतरंड उदंड नांदणा-या देशातदेखील अशी दखल घेतली जाणे अत्यंत आवश्यक ठरते.

मतदार ज्या वेळी मतदान करतात त्या वेळी, सरकारतर्फे प्रवर्तित करण्यात आलेल्या अनेकानेक आर्थिक योजना व उपक्रमांचा, सुशासनसंलग्न घटकांचा त्यांच्या निवडीवर काय प्रभाव पडत असतो या बाबीचा अभ्यास या ठिकाणी मांडण्यात आलेला आहे. विविध प्रकारच्या संख्याशास्त्रीय पद्धतींचा तसेच साधने व समीकरणांचा आधार या अभ्यासाकरिता घेतलेला दिसेल. आपल्या देशातील राजकीय व्यवस्थेमध्ये आघाडीवर असलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष या दोन राजकीय पक्षांना २००९ सालातील लोकसभा निवडणुकीदरम्यान राज्याराज्यांत मिळालेल्या मतांची (तिथे झालेल्या एकंदर मतदानातील) टक्केवारी हा या अभ्यासातील केंद्रबिंदू आहे. भारताच्या निवडणूक आयोगाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेली निवडणूकविषयक आकडेवारी या अभ्यासासाठी वापरण्यात आलेली आहे. तर, आपल्या देशातील प्रचलीत आर्थिक तसेच सुशासनसंलग्न घटकांसंदर्भातील आकडेवारीसाठी विविध प्रकारच्या अधिकृत व प्रकाशित दस्तऐवजांचा आधार घेतलेला आहे.



या ठिकाणी आणखी एका बाबीची नोंद करून ठेवणे गरजेचे ठरते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष या दोन पक्षांना निवडणुकीत मिळालेल्या मतांच्या टक्केवारीचे जिंकलेल्या जागांमध्ये कसे व कितपत रूपांतर होते या पैलूचा विचार मात्र या अभ्यासादरम्यान केलेला नाही. वास्तवात असा अभ्यास करणे हे अधिक महत्त्वाचे व रोचक ठरते यात वाद नसला तरी ते काम तितकेच किचकट व गुंतागुंतीचेही आहे. निवडणुकीत एखादा पक्ष (अथवा आघाडी) किती जागा जिंकते हे वास्तवात कोणकोणत्या घटकांवर अवलंबून राहते हे जाणून घेणे हा कोणत्याही अभ्यासाचा अंतिम हेतू असतो हे निर्विवाद. परंतु, पक्षोपक्षांनी जिंकलेल्या जागांच्या संख्येवरच केवळ सारे लक्ष एकवटल्याने, नाना प्रकारच्या आर्थिक तसेच सुशासनसंलग्न घटकांना मतदार नेमका काय प्रतिसाद कसा देत असतात या वस्तुस्थितीचे निरीक्षण व परीक्षण करण्यावरील झोत ढळण्याची शक्यता असते.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष या दोन पक्षांना २००४ आणि २००९ या दोन सालांतील लोकसभा निवडणुकांदरम्यान मिळालेल्या मतांच्या टक्केवारीचा अभ्यास इथे केंद्रस्थानी आहे. २००४ सालातील लोकसभा निवडणुकीदरम्यान या दोन पक्षांना मिळालेल्या मतांच्या टक्केवारीच्या तुलनेत, २००९ सालातील लोकसभा निवडणुकीदरम्यान मिळालेल्या मतांच्या टक्केवारीत काय बदल झालेला आहे आणि तो बदल घडवून आणण्यास कोणकोणत्या चल घटकांचा (व्हेरिएबल्स) प्रभाव कारणभूत ठरलेला दिसतो याचा अभ्यास करण्यासाठी 'मल्टिव्हेरिएट रिग्रेशन इक्वेशन्स' या संख्याशास्त्रीय तंत्राचा अवलंब केलेला आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष या दोन पक्षांच्या मतदानांच्या टक्केवारीत घडून आलेल्या बदलाच्या अभ्यासासाठी 'मल्टिव्हेरिएट रिग्रेशन'च्या समीकरणांचे दोन वेगवेगळे संच तयार करून त्यांचा अभ्यास इथे केलेला आहे. २००४ आणि २००९ या दोन वर्षांतील लोकसभा निवडणुकांदरम्यान या दोन पक्षांना मिळालेल्या मतांच्या टक्केवारीमध्ये घडून आलेल्या बदलांची कारणमीमांसा उलगडणा-या चल घटकांचे दोन गटांत वर्गीकरण करता येते अथवा करता येणे शक्य आहे.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष या दोन पक्षांना राज्याराज्यांत, २००४ सालातील लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या मतांच्या टक्केवारीच्या तुलनेत २००९ सालातील निवडणुकीत मिळालेल्या मतांच्या टक्केवारीत झालेल्या बदलावर प्रभाव टाकणा-या घटकांचे महत्त्व राज्याराज्यांत बदलते. यांपैकी काही घटक असे आहेत की, काँग्रेसला (अथवा भारतीय जनता पक्षाला) २००९ साली राज्याराज्यांत मिळालेल्या मतांच्या टक्केवारीत २००४ सालच्या तुलनेत झालेल्या बदलांवर त्यांचा प्रभाव पडणे वा न पडणे हे त्या त्या राज्यात काँग्रेस अथवा त्याचा मित्रपक्ष (अथवा, भारतीय जनता पक्ष किंवा त्याचा मित्रपक्ष) त्या वेळी सत्तेवर होता वा नव्हता यांवर अवलंबून राहते. तर, काही घटक असे आहेत की, २००९ सालच्या निवडणुकीत काँग्रेसला (अथवा भारतीय जनता पक्षाला) मिळालेल्या मतांच्या टक्केवारीत २००४ सालच्या तुलनेत घडून आलेल्या बदलांवर त्यांचा जाणवणारा अथवा न जाणवणारा प्रभाव हा त्या वेळी त्या त्या राज्यात काँग्रेस अथवा त्याचा मित्रपक्ष (अथवा, भारतीय जनता पक्ष किंवा त्याचा मित्रपक्ष) सत्तेवर होता वा नव्हता यांवर अवलंबून राहत नाही.

काँग्रेसला (अथवा भारतीय जनता पक्षाला) २००९ सालच्या लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या मतांच्या टक्केवारीत, २००४ सालच्या मतांच्या टक्केवारीच्या तुलनेत घडून आलेल्या बदलांवर प्रभाव जाणवणे अथवा न जाणवणे हे त्या वेळी त्या त्या राज्यात काँग्रेस अथवा त्याचा मित्रपक्ष (अथवा, भारतीय जनता पक्ष किंवा त्याचा मित्रपक्ष) सत्तेवर होता वा नव्हता यांवर अवलंबून न राहणा-या घटकांच्या गटात खालील घटकांचा समावेश होतोः

(१) पक्षाला २००४ सालच्या निवडणुकीत मिळालेल्या मतांची एकूणांतील टक्केवारीः त्या त्या राज्यातील मतदारांची त्या त्या पक्षाशी असलेली एकगठ्ठा बांधिलकी यातून स्पष्ट होते.

(२) मतदानाच्या टक्केवारीतील बदल

(३) सामाजिक तसेच लोकसांख्यिकी स्वरूपाचे संरचनात्मक अन्य चल घटकः अनुसूचित जातसमूहांचे त्या त्या राज्यातील एकंदर तसेच ग्रामीण लोकसंख्येमध्ये असणारे प्रमाण आणि



२००९ सालातील मार्च महिन्यात त्या त्या राज्यात विद्यमान असलेले नागरीकरणाचे प्रमाण हे दोन चल घटक इथे विचारात घ्यावे लागतात. २००४ आणि २००९ या कालावधीदरम्यान राज्याराज्यांतील नागरीकरणाच्या प्रमाणात घडून आलेला बदल हा चल घटकदेखील विचारात घेता येतो.

(४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत २००८-०९ या वित्तीय वर्षात प्राप्त झालेले पूरक उत्पन्न. अथवा, २००८-०९ या वित्तीय वर्षात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा लाभ मिळालेल्या अनुसूचित जातसमूहांतील लोकसंख्येचे त्या त्या राज्यातील एकंदर ग्रामीण लोकसंख्येतील प्रमाण.

(५) रस्त्यांची ग्रामीण अथवा शहरी घनता किंवा त्या घनतेमध्ये घडून आलेले बदल.

(६) ग्राहक किंमत निर्देशांकानुसार मोजलेली महागाई

(७) दरडोई राज्य निव्वळ उत्पादितामधील वाढीचा वार्षिक सरासरी दर.

काँग्रेस अथवा भारतीय जनता पक्ष या दोहोंपैकी त्या त्या राज्यात त्या त्या वेळी कोणता पक्ष अथवा त्याचा मित्रपक्ष सत्तेवर होता ती पार्श्वभूमी लक्षात घेतली नाही तर मतांच्या टक्केवारीतील बदलावर (२००४च्या सालच्या तुलनेत २००९ सालातील टक्केवारी) प्रभाव टाकणारे चल घटक संख्याशास्त्रीयदृष्ट्या 'सिग्निफिकंट' ठरताना दिसत नाहीत अशा वेळी पक्षाच्या पदरात पडलेल्या यशापयशाचे श्रेय अथवा अपश्रेय त्या त्या वेळच्या सत्ताधारी पक्षाच्या पदरी जाते किंवा कसे याचा अभ्यास करणे भाग पडते. ज्या चल घटकांच्याबाबतीत असा अभ्यास या ठिकाणी करून बघणे भाग ठरले ते चल घटक म्हणजेः

(अ) दरडोई राज्य ठोकळ उत्पादितामधील वाढीचा सरासरी दर तसेच राज्यातील एकूण किंवा नियमित रोजगारातील वाढीचा वार्षिक सरासरी दर.

(ब) स्वस्त धान्य दुकानांच्या प्रचलीत व्यवस्थेद्वारा मिळणा-या

अनुदानाचे राज्याराज्यातील कुटुंबांच्या अन्नधान्यावरील एकंदर खर्चात असणारे प्रमाण.

(क) पिण्यासाठी योग्य व सुरक्षित अशा पाण्याची सुविधा घरात अथवा जवळपास उपलब्ध असणा-या लोकसंख्येचे त्या त्या राज्यातील एकंदर लोकसंख्येमध्ये असणारे प्रमाण.

(ड) राज्याराज्यांतील गुन्ह्यांच्या प्रमाणात झालेले बदल.

काँग्रेस अथवा भारतीय जनता पक्ष या उभय पक्षांना २००९ सालच्या लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या मतांच्या टक्केवारीमध्ये बदल घडवून आणणारा एखादा चल घटक संख्याशास्त्रीयदृष्ट्या 'सिग्निफिकंट' ठरताना दिसतो अथवा नाही म्हणजे नेमके काय, हे समजावून घेणे या ठिकाणी प्रथम श्रेयस्कर ठरेल : **२००९ साली आपल्या देशात पार पडलेली लोकसभेची निवडणूक ज्या राजकीय व सामाजिक वातावरणात झाली त्याच वातावरणात ती निवडणूक पुन्हा पुन्हा घेतली गेली अथवा जाईल अशी कल्पना आपण घटकाभर करू. अशा काल्पनिक प्रयोगात, काँग्रेस पक्षाला मिळालेल्या मतांच्या टक्केवारीवरील एखाद्या घटकाचा परिणाम एकाच दिशेने झालेला आढळण्याची संभवनीयता असेल तर तो घटक संख्याशास्त्रीयदृष्ट्या 'सिग्निफिकंट' आहे अथवा ठरतो, असे म्हटले जाते. किंवा, त्या घटकाच्या गुणकाला आपण संख्याशास्त्रीयदृष्ट्या महत्त्वाचा, म्हणजेच, 'सिग्निफिकंट' म्हणतो. एरवी अथवा अन्यथा, त्या घटकाला किंवा त्याच्या गुणकाला आपण संख्याशास्त्रीयदृष्ट्या गौण, म्हणजेच, 'इन्‌सिग्निफिकंट' असे संबोधत असतो. एखाद्या चल घटकाचा काँग्रेस पक्षाला मिळालेल्या मतांच्या टक्केवारीतील बदलावरचा प्रभाव १०० पैकी ९५ वेळा एकाच दिशेने घडून येत असण्याची संभवनीयता पुढ्यात आली तर तो चल घटक 'सिग्निफिकंट ॲट फाइव्ह परसेंट' असे म्हटले जाते.**

या अभ्यासाची ही चौकट समजावून घेतल्यानंतर आता, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष या दोन राजकीय पक्षांना २००९ सालातील लोकसभा निवडणुकीदरम्यान मिळालेल्या मतांच्या टक्केवारीमध्ये २००४ सालातील निवडणुकीदरम्यान मिळालेल्या मतांच्या तुलनेत घडून आलेल्या बदलांवर प्रभाव टाकणा-या घटकांचा तपशीलवार विचार करू:



**(१) मतदारांची पक्षनिष्ठाः** ज्या सगळ्या राज्यांत तसेच केंद्रशासित प्रदेशांत काँग्रेस व भारतीय जनता पक्ष यांना २००४ सालातील लोकसभा निवडणुकीमध्ये मिळालेल्या मतांची टक्केवारी चांगल्यापैकी अधिक होती त्या त्या सगळ्या राज्यांत आणि केंद्रशासित प्रदेशांत या दोन पक्षांना मिळालेल्या मतांची टक्केवारी २००९ सालच्या निवडणुकीतही अधिकच राहिल्याचे संबंधित आकडेवारी दर्शवते. परंतु, या ठिकाणी एका बाबीची नोंद घ्यायला हवी. ती अशी की, ज्या ज्या राज्यांत व केंद्रशासित प्रदेशांत या दोन पक्षांना मिळालेल्या मतांची टक्केवारी २००४ सालच्या निवडणुकीत मुळातच चांगल्यापैकी अधिक होती त्या त्या ठिकाणी २००९ सालातील निवडणुकीदरम्यान या दोन पक्षांना मिळालेल्या मतांच्या टक्केवारीमध्ये घडून आलेली वाढ तुलनेने कमी होती.

**(२) रोजगार हमीवरील दरडोई ग्रामीण मजुरी उत्पन्नः** २००९ साली घेण्यात आलेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्षाला मिळालेल्या मतांच्या टक्केवारीमध्ये (२००४ सालच्या तुलनेत) वाढ घडवून आणण्यासंदर्भात सर्वांत महत्त्वाचा ठरणारा चल घटक म्हणजे ग्रामीण भागातील नागरिकांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील मजुरीद्वारे मिळणारे दरडोई उत्पन्न. रोजगार हमी योजनेचा लाभ घेणा-या ग्रामीण भागातील लाभार्थींना मिळणारे दरडोई उत्पन्न आणि या योजनेचा लाभ मिळणा-या ग्रामीण लोकसंख्येचे त्या त्या राज्यातील एकंदर लोकसंख्येमध्ये असणारे प्रमाण यांचे गुणोत्तर असलेल्या या चल घटकात या दोहोंचे एकत्रित प्रतिबिंब पडलेले सापडते. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये अदा केल्या जाणा-या मजुरीचा, राज्यातील ग्रामीण लोकसंख्येच्या संदर्भात, दरडोई दर ज्या ज्या राज्यांमध्ये अधिक होता त्या त्या राज्यांत काँग्रेस पक्षाला मिळालेल्या मतांची एकूणांतील टक्केवारी अधिक असल्याचे दिसून येते. केवळ इतकेच नाही तर, भारतीय जनता पक्ष तसेच अन्य राजकीय पक्षांची मते आपल्याकडे वळवण्यातही त्या त्या राज्यांत काँग्रेस पक्ष यशस्वी ठरल्याचे स्पष्ट होते.

**(३) ग्रामीण रस्त्यांच्या घनतेमध्ये वाढः** रस्त्यांच्या घनतेमध्ये (दर चौरस किलोमीटर क्षेत्रावर पसरलेल्या रस्त्यांच्या जाळ्याची लांबी) सन २००४ ते

२००९ या कालावधीदरम्यान, ज्या ज्या राज्यांत वाढ घडून आल्याचे दिसते त्या त्या राज्यांत काँग्रेस पक्षाला २००९ सालातील लोकसभा निवडणुकीमध्ये मिळालेल्या मतांच्या टक्केवारीमध्ये (२००४ सालच्या तुलनेत) वाढ घडून आल्याचे आकडेवारीवरून ध्यानात येते. खरे पाहता, बारमाही रस्त्यांची सुविधा लाभलेल्या गावांचे राज्याराज्यांतील एकंदर गावांमध्ये असलेले प्रमाण हा, वाहतुकीच्या व दळणवळणाच्या सुविधेमध्ये घडून आलेल्या सुधारणेचा अधिक उचित निदर्शक ठरला असता. परंतु, या संदर्भातील अद्ययावत सांख्यिकी सहज उपलब्ध होत नसल्याने रस्त्यांची घनता या निदर्शकाचा वापर या ठिकाणी करणे भाग पडले आहे. या बाबतीत एक बाब उल्लेखनीय आहे. पंतप्रधान ग्राम सडक योजनेंतर्गत राज्याराज्यांतील ग्रामीण भागांत बांधल्या गेलेल्या रस्त्यांचे आणि त्यामुळे वाढलेल्या रस्त्यांच्या घनतेचे श्रेय मात्र मतदारांनी भारतीय जनता पक्षाच्या पदरात घातलेले दिसते. पंतप्रधान ग्राम सडक योजना भारतीय जनता पक्षाने त्याच्या अमदानीत (राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या कारकिर्दीत) प्रवर्तित केलेली असल्याने त्या योजनेमुळे रस्त्यांच्या वाढलेल्या घनतेचे श्रेय मतदार भारतीय जनता पक्षाला देत असावेत, असा निष्कर्ष यावरून काढता येईल.

(४) **नागरीकरण:** देशातील तसेच राज्याराज्यांतील नागरीकरणाच्या प्रमाणात घडून येत असलेल्या वाढीचे श्रेय काँग्रेस पक्षाला मिळत असल्याचे या अभ्यासावरून ध्यानात येते. शहरी विभाग हा भारतीय जनता पक्षाचा बालेकिल्ला समजला जातो. त्या पार्श्वभूमीवर हे निरीक्षण महत्त्वाचे ठरते. वाढत्या शहरीकरणाद्वारे स्थलांतरितांना तसेच शहरवासियांना रोजीरोटी व उत्पन्नवाढीच्या अधिक चांगल्या संधी उपलब्ध होत असाव्यात आणि त्याचे श्रेय हे समाजघटक केंद्रसरकारमध्ये सत्ताधारी असलेल्या पक्षाला देत असावेत, असा निष्कर्ष यावरून काढणे भाग ठरते. राज्याराज्यांच्या शहरी भागांतील रस्त्यांच्या वाढत्या घनतेचे श्रेयही मतदार भारतीय जनता पक्षाऐवजी काँग्रेस पक्षालाच देत असावेत, असे सांख्यिकी विश्लेषणावरून प्रथमदर्शनी दिसते. परंतु, त्या त्या राज्यात काँग्रेस अथवा भारतीय जनता पक्ष यांपैकी कोणता पक्ष सत्तेवर आहे या चल घटकाचा विश्लेषणामध्ये अंतर्भाव केल्यानंतर मात्र विश्लेषणाचे निष्कर्ष बदलताना दिसतात. ज्या



ज्या राज्यांत भारतीय जनता पक्ष २००९ साली सत्तेवर होता त्या त्या राज्यातील शहरी भागांत विस्तारलेल्या रस्त्यांच्या घनतेचे रास्त श्रेय त्या त्या राज्यातील मतदारांनी भारतीय जनता पक्षाच्या पदरात घातलेले दिसून येते.

(५) **पिण्याचे पाणी:** शुद्धीकरण केलेले पाणी नळांद्वारे पुरविले जाणे, व्यवस्थित आच्छादन असलेल्या विहिरीमधून पाण्याचा पुरवठा होणे, घरामध्येच पाण्याचा स्त्रोत उपलब्ध असणे अथवा राहत्या घराच्या परिसरात पाण्याची सुविधा असणे हे सगळे पर्याय 'पिण्याच्या पाण्याची सुविधा' या शीर्षकांतर्गत समाविष्ट केलेले आहेत. पिण्याच्या दृष्टीने सुरक्षित अशा पाणीपुरवठ्याची सुविधा लाभलेल्या कुटुंबांचे एकूणांतील प्रमाण हा चल घटक काँग्रेस तसेच भारतीय जनता पक्ष या दोन्ही पक्षांना मिळालेल्या मतांच्या टक्केवारीवर अनुकूल परिणाम घडवणारा घटक असल्याचे सांख्यिकी विश्लेषणावरून स्पष्ट होते. परंतु, संख्याशास्त्रीयदृष्ट्या मात्र हा घटक 'इन्सिग्निफिकंट' असल्याचे दिसते. ही बाब वरकरणी विस्मयकारक वाटण्याजोगीच आहे. परंतु वास्तवात तसे नाही. कारण, नळाने अथवा विहिरीवरून पाणीपुरवठा केला गेला तरी मुळात पाण्याचे स्त्रोतच जर आटलेले असतील अथवा जलस्त्रोतांमध्ये तुरळक प्रमाणातच पाणी असेल तर निवडणुकीमध्ये मतदारांकडून अनुकूल प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा मावळत जावी, हे ओघानेच येते.

(६) **रोजगार हमी योजना आणि सत्ताधारी पक्ष:** महात्मा गांधी रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी राज्यात प्रभावशाली पद्धतीने होते किंवा नाही त्यानुसार सत्ताधारी पक्षाच्या पदरात आनुषंगिक माप घालत असतानाच एकंदर ३५ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांपैकी १४ राज्यांतील मतदारांनी लोकसभेसाठी काँग्रेसला मतदान केल्याचे स्पष्ट होते. तर, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत दिले जाणारे दरडोई वेतनउत्पन्न राष्ट्रीय स्तरावरील 'मिडियन' दरडोई वेतनउत्पन्नापेक्षा स्थानिक पातळीवर अधिक आहे अथवा कमी आहे त्या नुसार १७ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील मतदारांनी काँग्रेस पक्षाच्या पदरात अनुक्रमे अनुकूल अथवा प्रतिकूल माप घातलेले दिसते. अशा वेळी, राज्यात काँग्रेस पक्ष अथवा

त्याचा मित्रपक्ष सत्तारूढ आहे अथवा नाही याची फिकीर मतदारांनी बाळगल्याचे विश्लेषण दर्शवत नाही. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत मिळणा-या दरडोई वेतनउत्पन्नाची पातळी आणि भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या मतांच्या टक्केवारीतील वाढ या दोहोंत सकारात्मक नाते असल्याचे एकूण १४ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये आढळून आले. तर, राज्यात काँग्रेस अथवा भारतीय जनता पक्ष यापैकी कोणताही पक्ष सत्ताधीश असला तरी, रोजगार हमी योजनेवरील दरडोई वेतनउत्पन्नाची पातळी आणि भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या मतांच्या टक्केवारीतील वाढ यांच्यात व्यस्त नाते असल्याचे २० राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये आढळले.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेवर राज्याराज्यांत मिळणा-या सरासरी वेतनउत्पन्नापेक्षाही, अनुसूचित जातसमूहांमध्ये गणल्या जाणा-या आपल्या देशातील एकंदर ग्रामीण लोकसंख्येपैकी किती लोकसंख्येला या योजनेचा लाभ प्रत्यक्षात मिळाला अथवा मिळतो हा घटक आणि मतदारांची पक्षपसंती यांतील सहसंबंध अतिशय प्रगाढ असल्याचे दिसून येते. राज्याराज्यांतील अनुसूचित जातसमूहांच्या एकूण लोकसंख्येपैकी नेमक्या किती टक्के लोकसंख्येला महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा वास्तवात लाभ मिळाला याचे सूचन या घटकावरून घडते. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेवर राज्याराज्यांत मिळणा-या सरासरी दरडोई वेतनउत्पन्नाच्या ठिकाणी या चल घटकाची योजना केली आणि काँग्रेस (अथवा भारतीय जनता पक्ष) या दोन पक्षांना २००९ सालच्या निवडणुकीत मिळालेल्या मतांच्या टक्केवारीतील (२००४ सालच्या निवडणुकीत मिळालेल्या मतांच्या टक्केवारीच्या तुलनेत) फरक अभ्यासला तर हाती येणारे निष्कर्ष एकसारखेच परंतु संख्याशास्त्रीयदृष्ट्या अंमळ दुर्बळ असल्याचे ध्यानात येते. राज्याराज्यातील एकंदर लोकसंख्येमध्ये अनुसूचित जातसमूहांच्या लोकसंख्येचे असणारे प्रमाण हा गुणक या ‘रिग्रेशन’ समीकरणामध्ये संख्याशास्त्रीयदृष्ट्या ‘सिग्निफिकंट’ असल्याचे स्पष्ट होते. मात्र, त्याचे चिन्ह उणे आहे. म्हणजेच, अनुसूचित जातसमूहांमध्ये गणल्या जाणा-या लोकसंख्येचे राज्याराज्यांतील एकंदर लोकसंख्येमध्ये असणारे प्रमाण आणि २००९ सालातील लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला



(अथवा भारतीय जनता पक्ष) मिळालेल्या मतांच्या टक्केवारीतील बदल यांच्यातील सहसंबंध संख्याशास्त्रीयदृष्ट्या ‘सिग्निफिकंट’ असला तरी त्या दोहोंतील नाते मात्र व्यस्त आहे, हे वास्तव ते उणे चिन्ह सूचित करते. हे चित्र विस्मयकारक वाटते. परंतु, राज्यशास्त्राच्या काही अभ्यासकांनी याबाबत केलेल्या अभ्यासांच्या आधारेदेखील असेच खुलासावजा स्पष्टीकरण दिलेले दिसते. सामाजिकदृष्ट्या तथाकथित निम्न स्तरांतील गणल्या जातसमूहांतील मतदारांनी काँग्रेसप्रणित संयुक्त पुरोगामी आघाडीला २००९ सालातील लोकसभा निवडणुकीदरम्यान मोठ्या प्रमाणावर मतदान केलेले नव्हते, असे या अभ्यासकांना आढळून आलेले होते. राज्याराज्यांतील ग्रामीण भागांत वास करणा-या कुटुंबांपैकी ज्या कुटुंबांना राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा लाभ मिळालेला होता अशा एकंदर कुटुंबांमध्ये अनुसूचित जातसमूहांमधील कुटुंबांचे प्रमाण किती होते, हा चल घटक आपल्या अभ्यासात आपण विचारात घेतलेला नाही, ही बाब या ठिकाणी अधोरेखित करावयास हवी. तर, अनुसूचित जातसमूहांमध्ये गणल्या जाणा-या एकंदर लोकसंख्येपैकी किती लोकसंख्येला राज्याराज्यांत रोजगार हमी योजनेचा प्रत्यक्षात लाभ मिळालेला होता हा चल घटक प्रस्तुत अभ्यासात संख्याशास्त्रीयदृष्ट्या ‘सिग्निफिकंट’ ठरलेला दिसतो, हे इथे आवर्जून ध्यानी घ्यायला हवे. रोजगार हमी योजनेचा लाभ अनुसूचित जातसमूहांमधील लोकसंख्येला किती व्यापक प्रमाणात मिळतो यांवर काँग्रेस पक्षाला २००९ सालातील लोकसभा निवडणुकीदरम्यान मिळालेल्या मतांच्या टक्केवारीतील वाढ अवलंबून राहते, हाच या सगळ्याचा इत्यर्थ. रोजगार हमी योजनेचा रोख अथवा भर हा खास करून अनुसूचित जातसमूहांवर आहे अथवा नाही, ही बाब मतदारांच्या लेखी गौण अथवा गैरलागू ठरते, ही महत्त्वाची वस्तुस्थिती इथे स्पष्ट होते.

अनुसूचित जातसमूहांचे राज्याराज्यांतील एकंदर लोकसंख्येमध्ये असणारे प्रमाण हा चल घटक भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या मतांच्या टक्केवारीतील बदलांचा अभ्यास करण्यासाठी मांडलेल्या ‘रिग्रेशन’ समीकरणामध्ये संख्याशास्त्रीयदृष्ट्या ‘सिग्निफिकंट’ ठरत नाही. अर्थात, हे तसे अनपेक्षित म्हणता येत नाही. **(कृपया पृष्ठ क्रमांक १८ पाहावे).**

# सामाजिक असमानतेचे उद्योजकीय परिमाण

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये सुमारे दोन दशकांपासून सुरूअसलेल्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या सामाजिक परिमाणांसंदर्भात मात्र म्हणावे तितके संशोधन झालेले नाही, असे या क्षेत्रातील संशोधकांचे मत आहे. भारतीय समाजव्यवस्थेत तसेच अर्थकारणात पूर्वापार नांदत आलेल्या विषमतेमध्ये आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या आजवरच्या अंमलबजावणी-दरम्यान वाढच झालेली आहे, असे एक विश्लेषण पुढे येते. त्याच वेळी, सामाजिकदृष्ट्या मागास गणल्या जाणा-या अनुसूचित जातीजमातींमधील समाजघटकांच्या ठायी वसणा-या उद्यमशीलतेला अंकूर फुटण्यास आणि त्या धुमा-यांची वाढ घडून येण्यास आर्थिक पुनर्रचना पर्वादरम्यानच्या खुल्या वित्तीय पर्यावरणामुळे अनुकूल अवकाश प्राप्त झालेला आहे, अशीही भूमिका मांडली जाते. या संदर्भातील प्रचलीत वास्तवाचे संबंधित आकडेवारीमध्ये पडणारे प्रतिबिंब न्याहाळणे उद्‌बोधक ठरते.

आपल्या देशात ज्या प्रमाणे दर दहा वर्षांनी जनगणना घेतली जाते त्याच धर्तीवर वेळोवेळी आर्थिक गणनाही (इकॉनॉमिक सेन्सस) करण्यात येत असते. अशी आर्थिक गणना अगदी अलीकडे म्हणजे २००५ साली करण्यात आली. तिची आकडेवारीही उपलब्ध आहे. आपल्या देशाच्या ग्रामीण तसेच शहरी भागांत कार्यरत असणा-या यच्चयावत बिगर शेती उद्योगव्यवसायांची गणना या सर्वेक्षणात करण्यात येत असते. संघटित तसेच असंघटित क्षेत्रातील वस्तुनिर्माण व सेवाउद्योग घटकांचा यांत अंतर्भाव असतो. २००५ सालातील आर्थिक गणनेद्वारे हाती येणा-या आकडेवारीचे सामाजिक विश्लेषण बघितले तर पुढ्यात उभरणारे चित्र अंतर्मुख होण्यास भाग पाडणारे ठरते.

आपल्या देशात २००१ साली घेण्यात आलेल्या जनगणनेनुसार अनुसूचित जातसमूहांतील लोकसंख्येचे देशातील एकंदर लोकसंख्येमध्ये असणारे प्रमाण होते जवळपास १६ टक्के इतके. मात्र, देशातील खासगी उद्योगघटकांपैकी केवळ ९.८ टक्के उद्योगव्यवसाय घटक हे अनुसूचित जातसमूहांतील उद्योजकांच्या मालकीचे असल्याचे आर्थिक जनगणना सांगते. या उद्योगव्यवसायांत आपल्या देशातील एकंदर बिगर शेती श्रमिकांपैकी जवळपास आठ टक्के श्रमिक सामावलेले होते. आपल्या देशातील अनुसूचित जमातींच्या संदर्भात जे चित्र दिसते तेही यापेक्षा फारसे वेगळे नाही. २००१ सालातील जनगणनेनुसार अनुसूचित जमातींमध्ये गणल्या जाणा-या लोकसमूहांचे आपल्या देशातील एकंदर लोकसंख्येमध्ये असणारे प्रमाण ७.७ टक्के इतके होते. तर, देशातील खासगी उद्योगधंद्यांपैकी जेमतेम साडेतीन टक्के उद्योगव्यवसाय घटकांची मालकी आदिवासी लोकसमूहांतील व्यक्तींकडे असल्याचे २००५ सालातील आर्थिक गणनेची आकडेवारी सांगते. आपल्या देशातील एकंदर बिगर शेती श्रमिकांपैकी अवघ्या ३.४ टक्के श्रमिकांना या व्यवसायघटकांमध्ये रोजगार उपलब्ध झालेला दिसतो.

अनसूचित जातीजमातींमधील लोकसंख्येचे आपल्या देशातील एकूण लोकसंख्येमध्ये जे प्रमाण आहे तिच्याशी सुसंगत ठरेल इतक्या प्रमाणात तरी खासगी उद्योगक्षेत्रातील व्यवसायघटकांची मालकी या समाजसमूहांतील व्यक्तींकडे नसावी हे वास्तव चिंतनीय नाही का ? ■■

---

**(पृष्ठ क्रमांक १६ वरून)**

परंतु, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा लाभ मिळालेल्या अनुसूचित जातसमूहांतील लोकसंख्येचे राज्याराज्यांतील अनुसूचित जातसमूहांच्या एकंदर लोकसंख्येमध्ये असणारे प्रमाण आणि अशा लाभार्थींना योजनेंतर्गत रोजगार प्राप्त होणा-या दिवसांची संख्या या चल घटकांचे गुणक मात्र संख्याशास्त्रीयदृष्ट्या 'सिग्निफिकंट' ठरतात. परंतु, या गुणकांचे चिन्ह मात्र उणे असल्याचे दिसते. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत राज्याराज्यांत मिळणारे दरडोई सरासरी वेतनउत्पन्न आणि भारतीय जनता पक्षाला २००९ सालच्या लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या मतांच्या टक्केवारीतील बदल यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणा-या 'रिग्रेशन' समीकरणातही हेच चित्र दिसले होते. राज्याराज्यांतील गुन्हेगारीचे प्रमाण, स्वस्त धान्य वितरण व्यवस्थेची कार्यक्षमता यांसारख्या, मतदानावर प्रभाव टाकणा-या अन्य घटकांचा विचार या पुढील भागात करायचा आहे. ■■

इतिहास

# कारणे युद्धाची...

जगाच्या इतिहासात काळ्या अक्षरांनी लिहिल्या गेलेल्या पहिल्या महायुद्धाच्या घटनेला या वर्षी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. २८ जुलै १९१४ रोजी युरोपीय देशांच्या भूमीवर चालू झालेल्या या युद्धात तेथील अनेक देशांचा सहभाग होता. सुरुवातीला या युद्धापासून अमेरिकेने स्वतःला दूरच ठेवले होते, पण जर्मनीने कुरापत केली आणि १९१७ मध्ये अमेरिकेला युद्धात सहभागी व्हावे लागले. हे युद्ध १८ नोव्हेंबर १९१८ रोजी संपले. काही अभ्यासकांच्या मते पहिले महायुद्ध संपले तेव्हाच दुस-या महायुद्धाची बीजे रोवली गेली होती. कालांतराने दुसरे महायुद्ध झाले आणि अणुबास्मुळे झालेल्या भीषण नरसंहाराने जग हादरले. त्या नंतर मात्र युद्ध होऊ नये यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर बरेच प्रयत्न करण्यात आले. तरीदेखील तिसरे महायुद्ध होईल का, याची चर्चा अधीमधी होत असते. ही चर्चा समजून घेण्यासाठी तसेच इतिहासापासून शिकण्यासाठी पहिले महायुद्ध का घडले ते थोडक्यात जाणून घेणे गरजेचे आहे (मात्र, युद्धांच्या सखोल इतिहासात जाण्याचे प्रयोजन इथे नाही). युरोपमधील देशांची सुरक्षाविषयक धोरणे, साम्राज्यवाद, युद्धखोरीची प्रबळ भावना व लष्करसज्जता, राष्ट्रवाद आणि ऑस्ट्रिया-हंगेरी येथील राजघराण्यातील व्यक्तीची करण्यात आलेली हत्या ही तात्कालिक घटना अशी पाच कारणे पहिल्या महायुद्धामागे होती, असे अभ्यासकांनी म्हटले आहे.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस हे युद्ध झाले तेव्हा युरोपीय देशांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध असलेल्या राष्ट्रांचे ढोबळमानाने पाच गट होते. त्यात पूर्वेकडील जपान हा एकमेव देश होता. ते गट असे - (१) रशिया आणि सर्बिया (२) जर्मनी आणि ऑस्ट्रिया-हंगेरी (३) फ्रान्स व रशिया (४) ब्रिटन, फ्रान्स व बेल्जियम (५) ब्रिटन आणि जपान. आपल्या गटातील देश अडचणीत आला तर त्याला सर्वतोपरी मदत करायची असा परस्परसंमतीचा करार या देशांनी केला होता.



थोड्या वेगळ्या शब्दांत म्हणायचे झाले तर आपापल्या देशाच्या संरक्षणाबाबतची ही त्यांची भूमिका होती. त्यामुळे कोणत्याही दोन गटांतील देश परस्परांविरुद्ध उभे ठाकले की आपापल्या गटातील राष्ट्राला मदत करण्यासाठी मित्रराष्ट्राला युद्धात सहभागी व्हावे लागत असे. म्हणजे, अन्य देशही स्वाभाविकपणे त्या संघर्षात ओढले जात होते. त्या काळी बाल्कन प्रदेशातील राष्ट्रांमध्ये अस्थिरता होती. कुठे राष्ट्रवादी गट उभे राहात होते तर, कुठे साम्राज्यवादी शक्ती आपले वर्चस्व प्रस्थापित करीत होत्या. त्या दरम्यान, ऑस्ट्रिया-हंगेरीच्या राजघराण्यातील वारसदार Archduke Franz Ferdinand यांची हत्या सर्बियातील राष्ट्रवादी गटाकडून (Black Hand) सारायेवो येथे २८ जून १९१४ रोजी करण्यात आली. त्या नंतर (सर्बियावर आपले वर्चस्व स्थापन करण्याच्या हेतूने) ऑस्ट्रिया-हंगेरीने सर्बियाविरुद्ध युद्ध पुकारले. सर्बियाला मदत करण्यासाठी रशिया युद्धात सहभागी झाली आणि ऑस्ट्रिया-हंगेरीच्या मदतीसाठी जर्मनीने युद्धात उडी घेतली. हळूहळू काही ना काही कारणाने अन्य देशही यात ओढले गेले. वासाहतिक धोरणांमुळे ब्रिटनसारख्या देशांच्या अंमलाखाली असलेली भारतासारखी राष्ट्रेही या युद्धात ओढली गेली. न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, दक्षिण आफ्रिका या देशांनी ब्रिटनला मदत केली. मित्रराष्ट्रांना मदत करण्याच्या धोरणामुळे इटली, जपान व अन्य राष्ट्रेही युद्धात सहभागी झाली. दुसरीकडे, जर्मनीने अमेरिकेची पाणबुडी बुडवून कुरापत काढल्याने अमेरिकाही युद्धात ओढली गेली.

सामाज्यवाद हेही एक महत्त्वाचे कारण या युद्धामागे होते. पहिल्या महायुद्धापूर्वी आफ्रिका आणि आशिया येथील काही भूभागांवर युरोपीय देशांची नजर होती. त्या काळी उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल पुरविणारे हे भूभाग होते. कच्च्या मालावर व पर्यायाने या भूभागांवर नियंत्रण ठेवून आपल्या देशाचा औद्योगिक विकास घडवून आणणे हा वासाहतिक धोरणाचाच भाग होता. त्यामुळे आपल्या स्पर्धेत असणारा देश युद्धात पिछाडीवर पडला की तो स्पर्धेतून बाद होण्याच्या शक्यता वाढतील असा विचार करून नही युद्धखोरीला महत्त्व दिले गेले असे मत जाणकार मांडतात. त्यामुळे युद्ध टाळण्याचे प्रयत्न झाले नाहीत.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस शस्त्रास्त्रस्पर्धा चालू झाली होती. शिवाय, युद्धखोरीची प्रबळ भावना मनात ठेवूनच धोरणे आखण्याकडे बहुतांश देशांचा कल राहिला होता. त्यामुळे आपापले सामर्थ्य वाढवणे याला महत्त्व प्राप्त झाले होते. जर्मनी व ब्रिटन यांनी यात आघाडी घेतली होती. शस्त्रास्त्रस्पर्धेत रशिया व अमेरिकाही होती. काही देशांमध्ये धोरणे ठरविताना लष्कराचे मत विचारात घेतले जात होते. परिणामी, काही ना काही कारणाने महायुद्धात अनेक देश सहभागी झाले.

महायुद्ध होण्यापूर्वी युरोपीय देशांमध्ये सीमांबाबत वाद होते आणि बाल्कन प्रदेशात अस्थिरता होती. शिवाय तेथे राष्ट्रवाद पुढे आला होता. बोस्निया आणि हर्जेगोविना या देशांमधील स्लाव्हिक नागरिकांना ऑस्ट्रिया-हंगेरी यांच्या अधिपत्याखाली राहावयाचे नव्हते. त्यांना सर्बियाचा भाग बनायचे होते. यामुळे तसेच ऑस्ट्रिया-हंगेरीच्या राजघराण्यातील वारसदार Archduke Franz Ferdinand यांची हत्या सर्बियातील राष्ट्रवादी गटाकडून झाल्याने युद्धाला तोंड फुटले. त्या नंतर राष्ट्रवादाची कास धरून अनेक राष्ट्रे युद्धात सहभागी झाली, असे मत अभ्यासक मांडतात. त्यामुळे दोन-चार देशांमधील युद्धाचे रूपांतर महायुद्धात झाले. आपले वर्चस्व आणि दबदबा कायम ठेवण्याच्या ईर्षेने युद्ध विस्तारत गेले.

या महायुद्धात लाखो नागरिकांचे बळी गेले. मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. जर्मनीने ११ नोव्हेंबर १९१८ रोजी शरणागती पत्करली. अन्य राष्ट्रांनीही युद्ध थांबवून शांततेच्या चर्चेसाठी मान्यता दिली. १८ नोव्हेंबर १९१८ रोजी पहिले महायुद्ध संपले. त्या नंतर फ्रान्समधील Versailles येथे करार झाला. हा करार Treaty of Versailles या नावाने ओळखला जातो. या करारातील काही मुद्यांवर मतभेद होते. विशेषतः, जर्मनीने आक्रमक भूमिका घेतल्यामुळे जर्मनीकडून मोठी नुकसान भरपाई देण्याबाबतचा मुद्दा अमेरिकेला मान्य झाला नाही. अमेरिकेने करारावर सही केली नाही. अमेरिका व जर्मनी यांच्यात १४ मुद्यांवर चर्चा झाली होती व अपेक्षित अशा मुद्यांवर अमेरिकेने जर्मनीला राजी होण्यास भाग पाडले होते. अन्य काही मुद्दे वादग्रस्त राहिल्याने पहिले महायुद्ध संपले तरी त्यातच दुसऱ्या महायुद्धाची बीजे रोवली गेली असे जाणकारांना वाटते.



युद्धखोरी टाळण्यासाठी अमेरिकेने जर्मनीबरोबर चर्चा केली. भविष्यात युद्ध टाळण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यासपीठ असावे यासाठी अमेरिकेने पुढाकार घेतला. त्या नंतर 'लीग ऑफ नेशन्स'ची स्थापना झाली. पण तेव्हा अमेरिका 'लीग ऑफ नेशन्स'मध्ये सहभागी झालेली नव्हती. आजच्या संयुक्त राष्ट्रसंघाची ही पूर्वसुरी म्हटली जाते. 'लीग ऑफ नेशन्स' या प्रयत्नांना फारसे यश आले नाही आणि दुसरे महायुद्ध झाले ही वस्तुस्थिती आहे. पण पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या काळात विज्ञान-तंत्रज्ञान प्रगत होत होते. अणुबॉंबनिर्मितीचे प्रयत्न चालू होते. दुसऱ्या महायुद्धात अणुबॉंब पायी होणारा नरसंहार अनुभवलेल्या जगाने शहाणे होण्याचा प्रयत्न केला. संयुक्त राष्ट्रसंघाची आवश्यकता सर्वांना पटली. आजघडीला राष्ट्रसंघाचे काम फार मोठ्या प्रमाणावर पुढे गेलेले आहे. अर्थात, जगात छोटीमोठी युद्धे झाली पण तिसरे महायुद्ध होऊ नये यासाठी सर्व देश प्रयत्नशील आहेत. तरीदेखील तिसरे महायुद्ध होईल का, झाले तर काय अशा चर्चा चालू असतात. या संदर्भातील जाणकारांची मते पुढील लेखात मांडण्यात आली आहेत. ■■


**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणाऱ्या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

# तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

राजकीय

# ....युद्धांनंतर आजचे चिंतन-मंथन

इतिहास विसरणा-यांना इतिहास घडविता येत नाही, असे म्हटले जाते. इतिहासातील काही घटना वाईट तर काही चांगल्या असतात. वाईट घटना अभ्यासणे क्लेशदायक असते. पण त्या समजून घेणेही गरजेचे असते. युद्ध टाळता आले असते तर बरे झाले असते असेही नंतर वाटून जाते. पण ही पश्चातबुद्धी उपयोगाची नसते कारण युद्धामुळे विनाश घडून गेलेला असतो. अर्थात, काळाचे चक्र उलट फिरवता येत नाही. पण भविष्यात युद्ध होऊ नये यासाठी काही प्रयत्न करणे शक्य असते. त्यामुळे इतिहासातील घटनांवर चिंतन-मंथन होणे गरजेचे असते. दोन महायुद्धे पाहिलेल्या या जगात तिसरे महायुद्ध होईल का, याची चर्चा जाणकार करीत असतात. पहिल्या महायुद्धाच्या घटनेला शंभर वर्षे पूर्ण होत असताना त्या महायुद्धाच्या वेळी असलेली राजकीय परिस्थिती आणि त्या युद्धाला यंदा शंभर वर्षे पूर्ण होत असताना आजची राजकीय परिस्थिती यांतील काही साधर्म्यस्थळे वा फरक शोधण्याचा प्रयत्न अभ्यासकांनी केला आहे.

पहिले महायुद्ध झाले तेव्हा जगभरात ब्रिटिशांचा दबदबा होता. वासाहतिक धोरणामुळे ब्रिटिशांचा अंमल अनेक ठिकाणी होता. युरोपमधील औद्योगिक क्रांतीचा व त्यामुळे घडून आलेल्या प्रगतीचा लाभही ब्रिटिशांना झालेला होता. ब्रिटिशांसमोर आव्हान उभे ठाकले होते ते जर्मनीचे. आज जगभरात दबदबा आहे तो 'सुपरपॉवर' हे बिरुद मिळविणा-या अमेरिकेचा आणि अमेरिकेसमोर आव्हान आहे चीनचे. तेव्हाचा ब्रिटन व आजची अमेरिका ही लोकशाही समर्थक राष्ट्रे तर तेव्हाचा जर्मनी व आजचा चीन ही एका विशिष्ट विचारधारेला जवळ करणारी राष्ट्रे. लोकशाही समर्थक राष्ट्रे नागरिकांच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याला जपणारी तर तत्कालीन जर्मनी आणि चीनमध्ये सरकार म्हणेल ती पूर्वदिशा. तसेच सार्वजनिक चर्चाविश्वदेखील सरकारच्या अखत्यारितीलच जणू. त्या तुलनेने तेव्हाच्या ब्रिटनमध्ये व आजच्या अमेरिकेत सार्वजनिक चर्चाविश्व तसे खुले!



ब्रिटनच्या विरोधात उभ्या ठाकलेल्या जर्मनीत आणि आज अमेरिकेसमोर आव्हान उभे करणा-या चीनमध्ये राष्ट्रवाद हाही एक महत्त्वाचा धागा दिसून येतो. तेव्हा इंग्रजांच्या वसाहती आफ्रिकेत होत्या, आफ्रिकेतील व मध्य आशियातील भूमीवर जर्मनीने दावा केला होता. आज चीनदेखील आपल्या सीमारेषा ओलांडून काही भूभागांवर आपला हक्क प्रस्थापित करू पाहतो आहे. तसाच थोडा अप्रत्यक्षपणे धर्माचा व राष्ट्रवादाचा संदर्भही तेव्हा होता व आजही आहे. आज मध्य आशियातील इस्लामधर्मीय राष्ट्रे चर्चेत आहेत. इस्लाममधील शिया व सुन्नी यांच्यातील संघर्ष, अरब राष्ट्रांमधील जस्मिन क्रांती या शिवाय इराण, इराक, सीरिया, येमेन, सौदी अरेबिया ही राष्ट्रे आणि या देशांमधील खनिज तेलाच्या विहिरी हा जगाच्या राजकारणात एक मोठा चर्चेचा विषय बनून राहिला आहे. तर, पहिल्या महायुद्धाच्या काळात बाल्कन प्रदेशातील राष्ट्रे चर्चेत होती. या राष्ट्रांची तेव्हाची स्थिती व मध्यपूर्वेकडील राष्ट्रांची आजची स्थिती यांत काही साधर्म्य आढळते असे जाणकारांना वाटते. रशिया, जर्मनी आणि ऑस्ट्रिया-हंगेरी या तत्कालीन सबल राष्ट्रांच्या मदतीने बाल्कन प्रदेशात युद्धे होत होती. एका प्रकारे सबल राष्ट्रांचा संघर्ष जणू बाल्कन प्रदेशातील राष्ट्रांमुळे पुढे येत होता असे म्हणता येईल.

ख्रिस्तीधर्मीय राष्ट्रे - ग्रीस आणि बल्गेरिया आणि इस्लामधर्मीय तुर्कस्तान यांच्यातील संघर्ष तेव्हा चर्चेत होता. १९१४ पूर्वीही बाल्कन प्रदेशात अधूनमधून संघर्ष झालेले होते. राजकीयदृष्ट्या ही राष्ट्रे अस्थिर होती. संघर्षाच्या पार्श्वभूमीमुळे बाल्कन प्रदेशातील राष्ट्रे तेव्हा शस्त्रनिर्मात्यांकडून मोठ्या प्रमाणावर शस्त्रखरेदी करीत होती आणि त्यासाठी त्यांना ब्रिटिश, फ्रेंच आणि जर्मनीच्या सरकारांकडून कर्जही उपलब्ध होत होते. १९१२-१३ या दरम्यान बाल्कन प्रदेशात पहिले युद्ध झाले. तेव्हा मॉन्टेनेग्रो व सर्बिया यांनी एकत्र येऊन अल्बेनियाच्या उत्तर भागात हल्ला केला होता. तेव्हा तेथे मॉन्टेनेग्रीन्स वा सर्बियन नागरिकांचे वास्तव्य नव्हते. सर्बियाने आपले सैन्य मागे घ्यावे असे ऑस्ट्रिया-हंगेरीने म्हटले होते. तर, रशियाने सर्बियाला मदत करण्याची तयारी चालवली होती. फ्रान्सने रशियाला मदत करण्याचे ठरवले होते.

ब्रिटनने मध्यस्थी करून तेव्हाचा संघर्ष टाळला. त्या नंतर झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत अल्बानियाला स्वातंत्र्य देण्याचा निर्णय घेण्यात आला. नंतरही बाल्कन प्रदेशातील परिस्थितीत फार बदल झाले नाहीत आणि तो प्रदेश अस्थिरच राहिला. मध्यपूर्वेकडील भागात आज जशी स्थिती आहे त्या स्थितीशी थोडेफार साधर्म्य दर्शविणारी तेव्हाची स्थिती होती. बल्गारियाने जर्मनीचा पाठिंबा मिळवला होता. सर्बियाच्या मागे रशियाची ताकद होती. बोस्निया आणि हर्जेगोविना भागात आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी ऑस्ट्रिया-हंगेरी उत्सुक होते. तरीदेखील बाल्कन प्रदेशातील देश तेव्हा जर्मनी वा रशिया यांच्या हातातील बाहुले बनलेले नव्हते. आज मात्र मध्य पूर्वेकडील देश अमेरिका, रशिया वा चीन यांच्या प्रभावाखाली आहेत. इस्रायल-पॅलेस्तिन संघर्षात आज गाझा प्रदेशात संवेदनशील स्थिती आहे. तेथे इस्रायलने आपल्या वसाहती स्थापन करू नयेत, असे अमेरिकेला इस्रायलला कदाचित सांगावेही लागेल. दुसरीकडे, सीरियातील घडामोडींबाबत रशिया आणि चीन जागरूक आहेत. सीरियातील प्रश्न शांततेच्या मार्गाने सुटावा असे या देशांना वाटते आहे. अद्याप तेथील परिस्थिती अद्याप अशांत आहे.

इराण अण्वस्त्रे निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहे किंवा कसे यावरून जगभरात बरीच चर्चा झाली. या संदर्भात इराणने चीनचे बरेच सहकार्य घेतले असले तरी मध्यपूर्वेतील धोरणांवर चीनला मोठा प्रभाव पाडता आलेला नाही. या शिवाय, चीनला अमेरिकेबरोबरही चांगले संबंध ठेवायचे असल्याने मध्यपूर्वेतील देशांबाबत चीन काळजीपूर्वक पावले टाकते आहे. दरम्यान, आंतरराष्ट्रीय दबाव आल्यामुळे रशियाने मात्र इराणला शस्त्रपुरवठा करण्यात हात आखडता घेतला आहे. अशा परिस्थितीत १९१४ मध्ये युद्ध झाले तसे आता घडेल असे जाणकारांना वाटत नाही. देशादेशांमधील वादग्रस्त प्रश्न सोडविण्यासाठी युद्धाच्या मार्गाशिवाय पर्याय नाही, अशी भूमिका साधारणपणे १९व्या व २०व्या शतकात घेतली गेली. १९ व्या शतकात युरोपीय देशांमध्ये युद्धे झाली. पण त्या युद्धांची भौगोलिक व्याप्ती व कालावधी हा मर्यादित प्रकारात मोडणारा होता. युद्धभूमीवर प्रत्यक्ष लढणारे देशही मोजके होते व त्या देशांचे सैन्यही तसे मोजके होते.



तथापि, युद्धांमध्ये झालेली सर्व प्रकारची हानी लक्षात घेऊन संघर्षाचे मुद्दे सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करण्यात आले होते. १८७०मध्ये बर्लिन येथे झालेल्या काँग्रेसमध्ये बाल्कन प्रदेशातील मुद्दे सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता.

पण युद्धखोरी व आक्रमकता या मानसिकतेतून अनेक देश बाहेर पडलेले नव्हते. त्यामुळे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात पहिले (१९१४-१९१८) व दुसरे महायुद्ध (१९३९ ते १९४४) झाले. खरे तर, आंतरराष्ट्रीय पातळीवर युद्धे होऊ नयेत आणि चर्चेच्या माध्यमातून प्रश्न सुटावेत यासाठी पहिल्या महायुद्धानंतर १९१९मध्ये 'लीग ऑफ नेशन्स'ची स्थापना करण्यात आली होती. पण काही संघर्ष टाळण्यात 'लीग ऑफ नेशन्स'ला यश आले तरी दुसरे महायुद्ध काही टाळता आले नाही. शिवाय, 'लीग ऑफ नेशन्स'मध्ये सहभागी होण्यास अमेरिकेने नकार दिला होता. पहिल्या महायुद्धात अर्मेनियन नागरिकांच्या वांशिक हत्या ही जगाला हादरवणारी घटना ठरली. तर, दुस-या महायुद्धात अणुबाँबमुळे घडून आलेल्या प्रचंड नरसंहाराने जग हादरले. दोन महायुद्धांनंतर व विशेषतः अणुबाँबमुळे घडून आलेल्या संहारानंतर युद्धांकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलला असावा, असे अभ्यासकांना वाटते.

त्या नंतर संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. राष्ट्रसंघाच्या स्थापनेनंतरही काही युद्ध झाली आणि काही अभ्यासकांच्या मते राष्ट्रसंघासारखी संस्थाही कुठे कुठे अपुरी ठरू शकते. पण, राष्ट्रसंघाची आजवरची वाटचाल राष्ट्राराष्ट्रांचे सहकार्य मिळविण्याकडे व पर्यायाने युद्ध टाळून जागतिक पातळीवर शांतता कायम ठेवण्याकडे होत असल्याचे दिसते. युद्धासाठी आवश्यक असणारे सर्व प्रकारचे सामर्थ्य, युद्धाची रणनीती, युद्धाची मानसिकता यांबाबत जगभरातील अनेक राष्ट्रांमध्ये दोन्ही महायुद्धांपूर्वी बरीच चर्चा झालेली दिसते. कोणत्याही देशाने सर्व प्रकारे सामर्थ्यवान असावे याबाबत तेव्हा फारसे दुमत नव्हते (आजही नसावे?). युद्धासाठी तयार असणे ही एक अटळ आणि सकारात्मक बाब आहे, असे तेव्हा मानले जात होते. युद्धामुळे सर्व अनिष्ट बाबींचा विनाश होण्यास आणि मानवजातीला कल्याणकारक अशा बाबी पुढे येण्यास मदत होते, असे म्हटले जाई.

(शरीरातील अशुद्ध रक्त शुद्ध करण्याची प्रक्रिया ज्या प्रमाणे शरीरात घडत असते त्याप्रमाणे) युद्धामुळे वाईटाचा नाश होऊन चांगल्या बाबी पुढे आणण्याची संधी मिळते, अशा आशयाची विधाने तेव्हा केली जात असत. देशप्रेम जागविण्याची ही संधी घेण्याकडे अनेक देशांमधील धुरिणांचा कल असे, असे काही अभ्यासकांनी म्हटले आहे. युद्धाला सामोरे जाणे म्हणजे सामर्थ्यवान पुरुषी प्रवृत्ती असून अशी आक्रमकता चांगलीच होय, अशी एक धारणा युरोपीय देशांमधील उच्चवर्गात पूर्वी आढळत असे. अलीकडे मात्र ही धारणा बदललेली दिसते. अण्वस्त्रांच्या या काळात युद्ध अतिसंहारक, संपूर्ण जगाचा विनाश करणारे ठरू शकते हे सर्वच देशांमधील उच्चवर्गीयांच्या लक्षात आलेले आहे. त्यामुळे ते टाळण्यासाठी संवाद साधण्याचा कल वाढलेला दिसतो. शिवाय, अलीकडच्या काळात विज्ञान व तंत्रज्ञान यांतील प्रगतीमुळे देशोदेशींच्या समाजात अनेकानेक सकारात्मक बदल घडून आले आहेत. जागतिकीकरणाच्या या काळात देशादेशांमधील परस्परसहकार्याचे महत्त्व वाढलेले आहे. त्यामुळे युद्धाची चिथावणीखोर भाषा बाजूला ठेवून सौहार्दाची भाषा केली जाते आहे.

शंभर वर्षांपूर्वी, पहिल्या महायुद्धाच्या वेळी युरोपीय देशांमध्ये भविष्याबाबत एक प्रकारची काळजी, अस्वस्थता होती. रशियाच्या वाढत्या सामर्थ्यामुळे जर्मनी चिंतातूर तर स्लोव्हेनियांच्या राष्ट्रवादामुळे ऑस्ट्रिया - हंगेरी चिताक्रांत होते. १९०४-०५मध्ये जपानकडून पराभव पत्करावा लागलेला असल्यामुळे रशियाही काळजीग्रस्त होता. युरोपीय देशांमध्ये एकूणच अंतर्गत अस्वस्थता होती. कामगारांचे प्रश्न, मतदानाचा अधिकार आणि अन्य सामाजिक व आर्थिक प्रश्न महत्त्वाचे ठरत होते. आर्थिक-औद्योगिक क्षेत्रांत जर्मनीची आगेकूच चालू होती आणि जर्मनीच्या प्रगतीबाबत ब्रिटन व फ्रान्समध्ये चर्चा घडून येत होत्या. १८६० नंतर पहिल्या महायुद्धाच्या काळापर्यंतचा विचार केला तर जागतिक औद्योगिक उत्पादनातील जर्मनीचा वाटा सुमारे चौपटीने वाढला होता; तर, ब्रिटनच्या वाट्यात सुमारे एक तृतीयांशाने घट झालेली होती. ब्रिटनमधील पोलादाच्या उत्पादनापेक्षा जर्मनीतील पोलादाचे उत्पादन दुपटीने अधिक होते. रासायनिक आणि विजेची उपकरणे तयार करण्यातही जर्मनीने आघाडी घेतली होती.



विज्ञानाच्या क्षेत्रातही मॅक्स प्लँक आणि अल्बर्ट आइनस्टाइन यांच्या सिद्धान्तांमुळे पदार्थविज्ञानाच्या क्षेत्रात तर Robert Koch यांच्या कार्यामुळे जीवाणूविषयक संशोधनात जर्मनीचीच पावले पुढे पडत होती. मोटर गाडी आणि डिझेल इंजिन यांचा शोधही जर्मनीमधीलच होता. थोडक्यात, जर्मनी आघाडीवर आणि ब्रिटन पिछाडीवर असे चित्र पहिल्या महायुद्धाच्या काळात निर्माण झाले होते. आज चीन आणि अमेरिकेबाबत असे काहीसे चित्र आढळते. म्हणजे, कधी चीन आघाडीवर तर अमेरिका पिछाडीवर असे दिसते. दक्षिणेकडील देशांचा उदय आणि प्रामुख्याने चीनचा उदय हा अमेरिकेसाठी चर्चेचा विषय बनला आहे. अर्थात, अमेरिकेने चीनबाबत कोणतीही कृती केलेली नाही. मात्र, आंतरराष्ट्रीय राजकारणात आपला वरचष्मा राहील याची काळजी अमेरिका घेताना दिसते. अफगाणिस्तान, इराण आणि सर्बियातील घडामोडींबाबत अमेरिकेने घेतलेल्या भूमिकेवरून असे आढळते.

दरम्यान, १९व्या व २०व्या शतकातील वासाहतिक धोरण पहिल्या व दुस-या महायुद्धांनंतर मागे पडले. एकेकाळी पाश्चात्यांच्या वासाहतिक धोरणाचा भाग असलेली ब्राझील, नायजेरिया आणि भारत ही राष्ट्रे आज एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीस प्रगतीपथावर असलेली दिसतात. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका व रशिया या दोन महासत्तांमध्ये जणू जगाची विभागणी झाली होती. काही राष्ट्रे अमेरिकेच्या बाजूने तर काही रशियाच्या बाजूने होती. चालू शतकात मात्र तसे चित्र नाही. आता जगाच्या राजकारणात बहुध्रुवीय (multipolar) चित्र आढळते. १९व्या शतकाच्या अखेरीसही असेच काहीसे चित्र होते. अर्थात, बहुध्रुवीय चित्र असले तरी आजही अमेरिकेचे स्थान बळकट आहे. १९ व्या शतकात मात्र वासाहतिक धोरणे राबवूनही ब्रिटनचे स्थान अमेरिकेएवढे बळकट नव्हते. तेव्हा बहुध्रुवीय राजकारणात युरोपीय देशांमधीलच अनेक देश स्पर्धक म्हणून उभे ठाकले होते, असे काहीसे चित्र होते. तेव्हाच्या बहुध्रुवीय राजकीय चित्रात ब्रिटनने फ्रान्स आणि रशिया यांना आपले शत्रू मानले होते. पण ब्रिटन आणि फ्रान्स याच्यातील वाद मिटले आणि जपानकडून पराभव झाल्याने रशिया पिछाडीवर पडला आणि जर्मनीचे स्थान बळकट झाले होते.

आज २०१४मध्ये, वित्तीय संकटामुळे युरोपीय देशांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण आहे. पण ग्रीसमध्ये जेवढी अस्थिरता आढळली त्या तुलनेने अन्य देशांमध्ये ती जरा कमी प्रमाणात आढळली. अस्थिरतेमुळे युद्ध हा विषय कधीच चर्चेचा बनला नाही. तर, वित्तीय संकटाला सामोरे जाण्यासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा प्रयत्न तेथे झाला.

आज जागतिकीकरणाची चर्चा असली शंभर वर्षांपूर्वीही साधारणपणे अशीच परिस्थिती होती. जागतिकीकरणाची पावले तेव्हाही पडत होती. टेलिग्राम, दूरध्वनी, विमाने आणि बोटी यांमुळे जगभरातील नागरिकांचा संचार व संपर्क त्या पूर्वीच्या शंभर वर्षांपूर्वीच्या तुलनेत वाढलेला होता. आर्थिक-औद्योगिक विकास घडवून आणण्यासाठी देशादेशांमधील गुंतवणूक व व्यापार यात हळूहळू वाढ होत होती. तसेच, सांस्कृतिक देवाणघेवाणही होऊ  लागली होती. तर, गेल्या शंभर वर्षांपूर्वीच्या तुलनेत जगभरातील संचार व संपर्क आज मोठ्या प्रमाणावर वाढलेला दिसतो. स्वाभाविकच विविध क्षेत्रांना त्याचा उपयोग होतो. तसेच, अर्थउद्योगाला उभारी मिळत असल्याचे दिसून येते.

पहिल्या महायुद्धाचा काळ आणि आजचा काळ यांतील एक महत्त्वाचा फरक असा की, तेव्हा महायुद्ध झाले तरी त्यात धार्मिक संघर्ष नव्हता. यात फक्त तुर्कस्तानचा अपवाद वगळला प्रामुख्याने धर्मनिरपेक्ष अशा काही मुद्द्यांवर युद्ध झाले. तर, अलीकडच्या काळात संघर्षांच्या संदर्भात धर्म ही एक न टाळता येणारी बाब बनली आहे. अर्थात, आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये व परस्पर सहकार्याच्या कामी धर्म हा मुद्दा स्थान मिळवतो असे नाही. पण धर्माच्या प्रभावामुळे व धर्माच्या नावाखाली दहशतवादी प्रवृत्ती वर उफाळून येत आहेत ही वस्तुस्थिती नजरेआड करता येत नाही. या संदर्भात मध्य आशिया चर्चेचा केंद्रबिंदू बनला आहे. पहिल्या महायुद्धाच्या काळात राष्ट्रवाद हा एक चर्चेचा मुद्दा होता. पण काही अभ्यासकांच्या मते प्रखर राष्ट्रवाद हे युद्धामागील कारण नसून युद्धाचा तो एक परिणाम म्हणता येईल. राष्ट्राराष्ट्रांमधील द्वेष व तिरस्कार यांमुळे युद्ध घडून आले. युद्धाची तळी उचलून धरण्यासाठी द्वेष व तिरस्कार या भावना/कारणे पुढे करण्यात आली.



पहिल्या व दुस-या महायुद्धांनंतर झालेली हानी भरून काढण्याचा काळ सर्वच राष्ट्रांसाठी खूप कठीण होता. अनेक देशांमध्ये विविध समागजटांवर अन्याय, अत्याचार झाले. हत्याकांडे झाली. १९२० ते १९३० या काळात लोकशाहीवादी राष्ट्रांनाही हादरे बसले. राष्ट्रवादी भावना प्रबळ झाल्या. महायुद्धांच्या काळातील अनेक दुर्दैवी घटना देशोदेशींच्या सरकारांना व नागरिकांना धडा शिकविण्यासारख्या ठरल्या. आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध पातळ्यांवर सुसंवाद चालू राहण्याची निकड या युद्धांनंतर प्रकर्षाने पुढे आली. म्हणूनच, संयुक्त राष्ट्र संघासारख्या संघटनांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. आजही राष्ट्रसंघाने अधिक प्रभावी भूमिका बजावावी असेही म्हटले जाते.

अलीकडच्या काळात अमेरिका, रशिया व अन्य युरोपीय देश हे संघर्षापेक्षा समन्वयाकडे जाण्याच्या बाजूने आहेत. किमान तसा प्रयत्न तरी ते करीत असल्याचे चित्र युरोपीय देशांमधील वित्तीय संकटांनंतर पुढे आले आहे, असे जाणकारांना वाटते. त्या तुलनेने मध्यपूर्व आशियातील देश आजही अस्थिरतेकडे झुकलेले दिसतात. त्या अस्थिरतेची तुलना पहिल्या महायुद्धाच्या काळातील बाल्कन प्रदेशातील राष्ट्रांमधील अस्थिरतेशी काही अभ्यासकांनी केली आहे. इस्लाममधील शिया व सुन्नी यांच्यातील संघर्ष आणि सीरिया, येमेन या अरब राष्ट्रांमधील जस्मिन क्रांती यांमुळे ही राष्ट्रे अस्थिर आहेत. शिवाय इराण व सौदी अरेबिया हे देश मूलतत्त्ववादाकडे झुकल्याने धर्मचा विषयही तेथे डोकावतो. त्यातच जगभरातील सर्वच देशांचा विकास ऊ र्जासघन असल्याने या देशांमधील खनिज तेलाच्या विहिरींवर वर्चस्व करण्याचा प्रयत्न बडी राष्ट्रे करीत आहेत. अर्थात, असे असले तरी १९१४मध्ये बड्या शक्ती युद्धात खेचल्या गेल्या तसे आता घडणार नाही असे म्हटले जाते. गेल्या शंभर वर्षांचा इतिहास अभ्यासताना युद्ध टाळणे ही सर्वच देशांसाठी प्राधान्याची बाब ठरावी, असे प्रतिपादन आताशा केले जाताना दिसते. मात्र त्यासाठी मध्यपूर्वेकडील देशांमध्ये विशेष लक्ष देण्याची सूचना मांडली जाते आहे. युद्ध टाळण्याचा प्रयत्न सर्वच देशांकडून होत राहिला तरी जगाची वाटचाल समन्वयाकडे होणे हे नेहमीच आव्हानाचे ठरते आहे. ■■

इतिहास

# "लोकशाहीसाठी जग सुरक्षितच हवे..."

पाश्चात्य जग म्हटले की युरोपीय देश आणि अमेरिका असे समीकरण झाले आहे. युरोपीय देशांमधील नागरिकांनी स्थलांतर केल्याने आजची प्रगत अमेरिका घडली आणि जगाच्या नकाशात अमेरिकेने महत्त्वाचे स्थान मिळवले आहे हेही खरेच! तरीदेखील युरोपीय देशांपासून चार हात दूर राहण्याचा प्रयत्न अमेरिकेने कायम केला आहे. युरोपच्या भूमीवर पहिले महायुद्ध चालू होते तेव्हाही अमेरिका त्या युद्धापासून लांबच होती. मात्र मित्रराष्ट्रांनी विनंती केल्यास त्यांना मदत करायची असे अमेरिकेचे धोरण होते. १९१४मध्ये युद्ध चालू झाले आणि १९१७मध्ये अमेरिका युद्धात उतरली. त्या मागे दोन घटना कारणीभूत होत्या. मित्रराष्ट्रांना शस्त्रपुरवठा करणारे अमेरिकेचे जहाज जर्मनीने १९१५मध्ये बुडवले, त्यामुळे १२८अमेरिकी नागरिकांना जलसमाधी मिळाली, या घटनेने अमेरिका संतप्त झाली ही ठरली पहिली घटना. तर, मित्रराष्ट्रांच्या मदतीला


वुड्रो विल्सन (१८५६-१९२४)

येणा-या पाणबुड्यांवर वेळप्रसंगी हल्ला करण्याचे जर्मनीचे धोरण असल्याचा जर्मनीचा गुप्तसंदेश ब्रिटिश गुप्तचर संस्थांनी अमेरिकेपर्यंत पोहचवला. या नंतर लगेचच जर्मनीने तशी कृतीही केली आणि अमेरिकेची पाणबुडी इटलीनजीक बुडविण्यात आली. ही ठरली दुसरी घटना. २ एप्रिल १९१७ रोजी अमेरिका युद्धात उतरली तेव्हा अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी अमेरिकी काँग्रेसचा युद्धाला पाठिंबा मिळविण्यासाठी काँग्रेससमोर केलेले भाषण इतिहासात प्रसिद्ध झाले ते लोकशाहीच्या संदर्भात! 'लोकशाहीसाठी जग सुरक्षित हवे,' अशी अमेरिकेची भूमिका असल्याचे वुड्रो विल्सन यांनी म्हटले होते. २ एप्रिल १९१७ रोजी त्यांनी अतिशय गंभीरतापूर्वक केलेल्या त्या भाषणातील संपादित अंश असे -



*" जर्मनीने पाणबुड्यांसंदर्भात छेडलेले युद्ध हे मानवजातीविरुद्ध व सर्व देशांविरुद्ध छेडलेले युद्ध आहे. संपूर्ण मानवजातीसमोर या युद्धाचे आव्हान उभे ठाकले आहे. या आव्हानाला कशा प्रकारे सामोरे जायचे ते प्रत्येक देशाला ठरवायचे आहे. भावनातिरेक आणि द्वेष व सूड हे सर्व बाजूला ठेवून मानवाधिकारांसाठी हे युद्ध आपण लढले पाहिजे. मानवाधिकारांचा ठाम पुरस्कार करणारे अमेरिका हे एकमेव राष्ट्र आहे. युद्धात उतरण्याचा दुखद निर्णय आपल्याला घ्यावा लागतो आहे, हे मी गंभीरतापूर्वक स्पष्ट करतो. शरणागतीचा मार्ग आपण स्वीकारूशकत नाही. अमेरिकेचे सरकार व नागरिक यांच्याविरोधात जर्मनीने युद्ध छेडले आहे. त्याला तितकेच ठोस उत्तर देणे हे सद्यस्थितीत गरजेचे बनलेले आहे. याचबरोबर स्वार्थी आणि हुकुमशाही प्रवृत्तींच्या विरोधात तसेच शांतता आणि न्याय यांच्या समर्थनार्थ अमेरिका या युद्धात सहभागी होते आहे. तेच अमेरिकेचे उद्दिष्ट आहे, हेही जगाला सांगण्याची ही वेळ आहे.*

*शांतता प्रस्थापित करण्यासाठी लोकशाहीवादी राष्ट्रांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे. तसेच हुकुमशाही प्रवृत्तींचा बीमोड करण्याचे उद्दिष्ट ठेवायला हवे. लोकशाहीसाठी जग सुरक्षितच हवे. त्यासाठी राजकीय स्वातंत्र्याची पायाभरणी सुयोग्य पद्धतीने व्हायला हवी. या युद्धासाठी जो काही त्याग करावा लागणार तो आपण आनंदाने व कोणत्याही परतफेडीची अपेक्षा न ठेवता करू. हे एक दुखद कर्तव्य आपल्या सर्वांना पार पाडायचे आहे. अमेरिकेसारख्या देशातील शांतताप्रेमी नागरिकांना युद्धाचे चटके सहन करायला लागतील ही बाब नक्कीच खेदाची वाटते. पण आताच्या परिस्थितीत शांततेच्या मूलमंत्रपेक्षा नागरिकांचे हक्क जपणे हेच अत्यावश्यक आहे. लोकशाहीचे मूल्य उराशी बाळगून असलेले आपण सर्व जण छोट्या छोट्या देशातील नागरिकांच्या हक्कासाठी लढणार आहोत. या छोट्या देशांतील नागरिकांना हुकुमशाही प्रवृतींसमोर नमावे लागले आहे. त्या नागरिकांचे हक्क आणि देशांचे स्वातंत्र्य सुरक्षित राहील तेव्हाच अमेरिका समाधानी राहू शकेल. या कमासाठी आपले सर्वस्व झोकून देण्यासाटी आपण सज्ज राहू. लोकशाही आणि मानवाधिकांसाठी अमेरिकेने आपले रक्त सांडले तर ती अभिमानाचीच बाब ठरेल."* ■■

जिकडेतिकडे

# वैद्यकीय पर्यटन

माणसांचे आयुष्यमान वाढते आहे, विविध प्रकारचे आजार वाढत आहेत, त्याचबरोबर नानाविध प्रकारचे औषधोपचार व शस्त्रक्रियाही उपलब्ध होत आहेत. त्यामुळे देशोदेशी वैद्यकीय सेवा हा अधिक चर्चेचा व काळजीचा तसेच खर्चाचा मुद्दा बनलेला आहे. जागतिकीकरणाच्या काळात वैद्यकीय सेवाही जागतिक बनली आहे. कोणती वैद्यकीय सेवा कोणत्या देशांत चांगली मिळते आणि ती आपल्या खिशाला परवडू शकते का, असा शोध घेणे इंटरनेटमुळे शक्य झाले. मग, वैद्यकीय सेवेसाठी करावा लागणारा आपल्या देशातील खर्च व अन्य देशांमधील खर्च याचीही तुलना होऊ लागली आणि त्यातून वैद्यकीय पर्यटनाचे 'मॉडेल' पुढे आले.

विशेषतः, चालू शतकाच्या पहिल्या दशकात याबाबत बरीच चर्चा झाली. चांगली वैद्यकीय सेवा मिळणे आणि खर्चात बचत होणे या दोन बाबी रुग्णांसाठी महत्त्वाच्या ठरतात असे मग लक्षात आले. स्वाभाविकच विमा कंपन्यांचे आणि विविध देशांतील सरकारांचे पैसे वाचणार असेही स्पष्ट झाले. Patients Beyond Borders या संस्थेच्या माहितीनुसार गुडघ्याची वाटी बदलण्याची करण्याचा खर्च अमेरिकेत साधारणपणे ३४ हजार डॉलर, सिंगापूर इथे १९२०० डॉलर, थायलंड इथे ११५०० डॉलर तर कोस्टारिका इथे ९५०० डॉलर इतका येतो. युरोपीय देशांमध्येही खर्चात भिन्नता आढळते. मांडीच्या हाडाच्या शस्त्रक्रियेचा खर्च ब्रिटनपेक्षा स्पेनमध्ये सुमारे ४००० डॉलरने कमी येतो. त्यामुळे अन्य देशांत शस्त्रक्रिया करून खर्चात बचत करण्याचा मार्ग अनेकांनी स्वीकारला. म्हणजेच, वैद्यकीय पर्यटनाचा लाभ जगभरातील अनेकांनी करून घेतल्याचे दिसून आले आहे. काही अमेरिकी विमा कंपन्यांनी २००५च्या सुमारास याबाबत विशेष अभ्यास केला. परदेशांतील काही खाजगी रुग्णालयांना भेट दिल्यानंतर त्या विमा कंपन्यांना असे आढळले की परदेशांतील अनेक रुग्णालये श्रीमंत देशांमधील रुग्णालयांइतकीच चांगली आहेत; मात्र तुलनेने ती स्वस्त आहेत.



या नंतर वैद्यकीय पर्यटनाची चर्चा चालू झाली आणि हा व्यवसाय तेजीत येईल, असा अंदाज जाणकार वर्तवू लागले. परदेशांतील वैद्यकीय सेवेचा लाभ घेणा-या अमेरिकी नागरिकांची संख्या २०१२पर्यंत सुमारे दसपटीने वाढेल असेही मत मांडले गेले. पण प्रत्यक्षात तसे घडलेले नाही. याबाबत अभ्यास करताना एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात आला की, या संदर्भातील नेमकी माहिती (data) उपलब्ध नाही. Deloitte या कंपनीच्या अभ्यासानुसार वैद्यकीय पर्यटनाला जाणा-या अमेरिकी नागरिकांची संख्या २००७मध्ये होती सुमारे साडेसात लाख! मात्र वैद्यकीय पर्यटनाला जाणा-या अमेरिकी नागरिकांची संख्या २००८मध्ये फक्त दहा हजार असल्याचे McKinsey या कंपनीने म्हटले होते. तरीदेखील वैद्यकीय पर्यटनाला जाणा-या नागरिकांच्या संख्येत थोडी वाढ होत गेली आहे हे काही प्रमाणात खरेच आहे, असे जाणकार म्हणतात. कारण, थायलंडमधील Bumrungrad हे रुग्णालय परदेशी नागरिकांच्या पसंतीस उतरले असून त्या रुग्णालयाचा आलेख सतत उंचावला आहे. तरी पण नेमकी माहिती (data) उपलब्ध नाही. Patients Beyond Borders या संस्थेच्या माहितीनुसार वैद्यकीय पर्यटनासाठी जगभरातून सुमारे १ कोटी २० हजार नागरिक कुठे ना कुठे प्रवास करतात. त्यातील बहुधा १० लाख अमेरिकी नागरिक असावेत. वैद्यकीय पर्यटनाच्या व्यवसायातील जाणकारांच्या मते रुग्णांच्या संख्येत वाढ झालेली असली तरी ही वाढ अपेक्षेइतकी वा अंदाज वर्तविला गेला होता तितकी झालेली नाही.

काही रुग्णांनी परदेशांत जाऊन जाऊन उपचार घेतले असले तरी साधारणपणे परदेशात जाऊन वैद्यकीय उपचार करवून घेण्याची अनेक रुग्णांची मानसिकता नाही, असे आढळते. आपल्या देशात, वास्तव्याच्या ठिकाणी शक्य तेवढ्या वाजवी दरात वैद्यकीय सेवा मिळवण्याकडे अनेकांचा कल राहिलेला दिसतो. अमेरिकेतील Hannaford या सुपरमार्केटने आपल्या कर्मचा-यांना वैद्यकीय सेवांबाबत सवलत देताना, गुडघ्यावरील शस्त्रक्रिया सिंगापूर येथे जाऊन केली तर कंपनी कर्मचा-याच्या परदेशात जाण्यायेण्याच्या खर्चासह सर्व खर्च करेल, असे स्पष्ट केले होते. पण कंपनीने दिलेला हा पर्याय कोणी स्वीकारला नाही.

खरे तर वैद्यकीय सेवा घेताना विमा कंपन्यांनी आणि सरकारने दिलेल्या सुविधांचा लाभ उठवत खर्चात बचत करण्याचा मार्ग रुग्णांकडून स्वीकारला जाईल असा एक अंदाज बांधून वैद्यकीय पर्यटनात वाढ होईल असे म्हटले गेले होते. पण वैद्यकीय पर्यटनाचा लाभ घेण्यास किती टक्के नागरिक उत्सुक असतील याबाबत नेमका अंदाज न आल्याने विमा कंपन्या यात गुंतवणूक करण्यास अनुत्सुक होत्या, असे मत काहींनी मांडले आहे. या शिवाय, विमा घेणा-यांसाठीही हा मार्ग तेवढा सोपा नव्हता. परदेशांतील रुग्णालय निवडणे, त्या संदर्भातील सर्व कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी पायपीट करणे आणि मायदेशी परत आल्यानंतर आजारपणाबाबतचा 'फॉलोअप' या बाबी रुग्णांसाठी काहीशा त्रासदायक ठरत होत्या. शिवाय, अंशतः का होईना पण स्थानिक वैद्यकीय सेवेची नाराजी पत्करावी लागणे हाही एक मुद्दा रुग्णांनी विचारात घेतला असावा असेही म्हटले जाते. अर्थात, यांतून मार्ग काढून वैद्यकीय पर्यटनाचा पर्याय अनेकांनी निवडला असला तरी सर्वांनाच तो तितका योग्य वाटला असेलच असे नाही.

सरकारांची भूमिकाही इथे महत्त्वाची ठरते. रुग्णांनी आपल्याच देशांत वैद्यकीय सेवा घ्यावी यासाठी वैद्यकीय पर्यटनाचा पर्याय आपल्याच देशात राबवणे म्हणजे एक प्रकारे आरोग्यविषयक असलेल्या आपल्याच देशातील धोरणांचे अपयश मान्य करणे होय, असे म्हटले गेले. त्यामुळे वैद्यकीय पर्यटनाला सरकारांनी चालना दिली नाही. रुग्णसेवेसाठी तिष्ठत असणा-या रुग्णांना अन्य युरोपीय देशांमध्ये उपचार घेण्याची परवानगी ब्रिटनमधील सरकारने २००२मध्ये दिली होती. त्यावर काहींनी टीका केली होती. पूर्व युरोपीय देशांत वैद्यकीय सेवेवरील खर्च कमी होतो म्हणून जर्मनीतील काही नागरिक वृद्धापकाळात तेथे वास्तव्यास जातात. या संदर्भात जर्मनीतील सरकार रुग्णांबाबत योग्य धोरणे आखत नाही, अशी टीका जर्मन नागरिकांनी केली होती. अर्थात, परदेशांतील वैद्यकीय सेवा घेणा-यांचे प्रमाण युरोपमध्येही फारसे नाही. युरोपीय देशांमध्ये आरोग्यावरील एकूण खर्चातील फक्त १ टक्का रक्कम ही परदेशांतील वैद्यकीय सेवा घेण्यासाठी खर्च केली जाते.



तथापि, वैद्यकीय पर्यटनाची शक्यता लक्षात घेऊन आरोग्यविषयक सेवासुविधा पुरविण्यासंदर्भात अमेरिका व युरोपीय देशांमध्ये विचारमंथन चालू आहे. याचा उपयोग रुग्णालये करून घेत आहेत. अमेरिकेतील 'क्लीव्हलँड क्लिनिक' आपली एक शाखा अबुधाबी येथे चालू करण्याच्या प्रयत्नात आहे. शिवाय, अबुधाबी येथील एका रुग्णालयाचे व्यवस्थापन 'क्लीव्हलँड क्लिनिक' करीत आहे. सिंगापूर येथील 'पार्क-वे केअर'तर्फे आशियात रुग्णालये स्थापन करण्यात येत आहेत. तर भारतातील 'अपोलो' रुग्णालयाची मॉरिशस येथे शाखा आहे. अमेरिकी कंपन्यांमधील कर्मचा-यांना वैद्यकीय सेवा देण्याबाबत कंपन्या आणि तेथील रुग्णालये यांच्यात करार होत आहेत. त्यामुळे देशांतर्गत वैद्यकीय पर्यटन असेही घडू शकेल! ■■

## निवेदन

'अर्थबोधपत्रिके'मध्ये प्रकाशित करण्यासाठी संशोधनपर लेखनसाहित्य भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीकडे सादर करण्याकडे अलीकडील काळात कल वाढलेला दिसतो. जाणकार, विचक्षण वाचकांना 'पत्रिके'बाबत वाटणा-या आत्मीयतेची, 'अर्थबोधपत्रिके'च्या विश्वसनीयतेची, संशोधनपर वाचनसाहित्याला वाहिलेले गंभीर प्रकृतीचे एक नियतकालिक या 'अर्थबोधपत्रिके'च्या प्रतिमेची जणू पावतीच त्याद्वारे मिळते. मात्र, अशा या लेखनसाहित्याचा अंतर्भाव 'पत्रिके'च्या अंतरंगात करण्यास आम्ही असमर्थ आहोत, याबद्दल सखेद दिलगिरी व्यक्त करण्याखेरीज पर्यायही नाही. एक तर, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेत कार्यरत असलेल्या संपादकीय विभागाने खास 'अर्थबोधपत्रिके'साठीच तयार केलेल्या मजकुराखेरीज अन्य मजकूर अंकात अंतर्भूत करावयाचा नाही, असे धोरण संस्थेने 'पत्रिके'च्या प्रारंभापासूनच अतिशय जाणीवपूर्वक आणि कटाक्षाने जपलेले आहे. तसेच, देश वा राज्य पातळीवरील प्रचलित विषयांचा ऊहापोह करणारे संशोधनपर लेखन प्रकाशित करणारे संशोधनविषयक नियतकालिक, असे 'अर्थबोधपत्रिके'चे स्वरूपही संस्थेस आरंभापासूनच अभिप्रेत नाही. त्यामुळे, प्रकाशन हेतूने संस्थेकडे सादर करण्यात येणारे लेखन स्वीकारण्यास आम्ही असमर्थ आहोत. 'अर्थबोधपत्रिके'वर प्रेम करणारे वाचक संस्थेची ही भूमिका समजावून घेतील, त्याबाबत त्यांचा कोणताही विपरित ग्रह होणार नाही, अशी आशा नव्हे तर खात्री आहे. लोभ आहेच तो उत्तरोत्तर वृद्धिंगत व्हावा, हीच मनःपूर्वक प्रार्थना.

### प्रमुख संदर्भ

**(A) Magazines -**
(1) The Economist February 15-21 st 2014.
(2) New Statesman 17 -23 January 2014
**(B)Books/Reports** - (1)Speeches That Changed The World - Quercus Publishing Plc, London, Revised Edition 2010.
(2) Battles Half Won: India's Improbable Democracy; Ashutosh Varshney, Penguin Viking, Penguin Books India Pvt. Ltd., New Delhi, First published in Viking by Penguin Books India Ltd., 2013.
**(C) Websites**
(1) http://americanhistory.about.com (2)www.firstworldwar.com (3)www.americaslibrary.gov (4) www.lib.msu.edu/

**Poverty in India**
**लेखक वि.म. दांडेकर, नीळकंठ रथ**
(पृष्ठे १४०, किंमत : २०० रुपये)
**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा सर्वांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**

**दुसरी आवृत्ती प्रकाशित**
*आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणा-या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ*
**कर्ता-करविता**
**आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन**
**लेखक - रमेश पानसे, राज्यश्री क्षीरसागर, अनिता देशमुख-बेल्हेकर**
**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**
●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.
**पृष्ठे २४२** **किंमत ३५०/-रु पये**



## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

### 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**वार्षिक वर्गणी** **फक्त १०० / - रुपये**
**द्वैवार्षिक वर्गणी** **फक्त १८०/ - रुपये**
**त्रैवार्षिक वर्गणी** **फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट**
**पंचवार्षिक वर्गणी** **फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट**

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये)
(२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी)
(३) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये)

RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: PNCW/M-125/2013-2015
Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month

## ग्रंथालयातील नवी पुस्तके

**(1) Economic Policies and India's Reform Agenda : New Thinking,** Reddy Y.V., Orient Blackswan, New Delhi, 2013, pp. 275, Price : Rs. 550/-

**(2) Why Nations Fail - The Origins of Power, Prosperity and Poverty,** Acemoglu Daron and James Robinson, Profile Books Limited, London, 2012, pp. 529, Price : Rs. 479/-

**(3) Income Tax Ready Reckoner: Assessment Year 2013-14,** Mehta N. V., Shri Kuber Publishing House, Mumbai, pp. 352, Price : Rs. 660/-

**(4) Quest for Development in Manipur: Continuity, Constraints and Contradictions:** Thangjam Homen amd Sharma H.I., Centre for Alternative Discourse, Manipur, Concept Publishing Company Private Limited, New Delhi, 2013 pp. 236, Price: Rs. 700/-.

**(5) Secularism and Pluralistic Democracy in India,** Raghupathy V., Mohan Vasundara, Centre for Alternative Discourse, Manipur, Concept Publishing Company Private Limited, New Delhi, 2013, pp. 236, Price: Rs. 900/-.

**(6) State Planning : A Handbook,** Roy Bedprakash Shyam, Centre for Alternative Discourse, Manipur, Concept Publishing Company Pvt. Ltd., New Delhi, 2013, pp. 304, Price: Rs. 1000/

**(7) Status of Rural Local Bodies Finance in Tamilnadu,** Palanithurai G., Sathish, Kalpana,Centre for Alternative Discourse, Manipur, Concept Publishing Company Private Limited, New Delhi, 2013, pp. 336, Price: Rs. 1000/-.

**(8) Problem of Peace Making in Mizoram,** Hmingthanga Lal, Edited by: Hluna, J. V., Centre for Alternative Discourse, Manipur, Concept Publishing Company Private Limited, New Delhi, 2013, pp. 160, Price: Rs. 450/-.

**(9) Governance, Security and Development,** Rao. K. Shreedhar, Centre for Alternative Discourse, Manipur, Concept Publishing Co. Pvt. Ltd. New Delhi, 2013, pp.382, Price: Rs. 1100/-

**(10) Keynesian Reflections,** Hirai T., Marcuzzo M., Mehring P., Oxford University Press, 2013, pp. 320, Price Rs 850/-



## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

### - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

●विकास चित्रे ●सुरिंदर जोधका ●रमानाथ झा ●अभय टिळक
●रवींद्र ढोलकिया ●ललित देशपांडे ●आनंद नाडकर्णी ●दिलीप नाचणे
●सुहास पळशीकर ●मनोहर भिडे ●योगेंद्र यादव ●नीळकंठ रथ
●ए.वैद्यनाथन ●एस. श्रीरामन

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**